नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २८२ * * अकोला * मंगळवार, दिनांक ८ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## मध्य प्रदेश, राजस्थानमध्ये उष्णतेची लाट

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :
राजस्थानमध्ये तीव्र उष्णतेचा काळ सुरू झाला आहे. आज, सोमवारी, १४ जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. रविवारी बाडमेर-जैसलमेरमध्ये पारा ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला. गेल्या २६ वर्षांमध्ये बाडमेरमध्ये एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात हे सर्वाधिक तापमान आहे. पुढील काही दिवस उष्णतेपासून आराम मिळण्याची शक्यता नाही.

येथे, राजस्थानहून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे, मध्य प्रदेशात वेळेपूर्वीच तीव्र उष्णता आली आहे. रविवारी भोपाळमधील तापमान ४०.५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. या हंगामातील हा उच्चांक आहे. राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये तापमान ४० ते ४२.२ अंशांच्या दरम्यान राहिले. मंदसौर, भिंड, मुरैना, श्योपूर आणि रतलाम येथे उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

अग्राग्रलेख

### खरीखरी...

## शेअर बाजारात हाहाकार

आज ट्रम्प यांच्या ज्यादागिरीमुळे जगातील सर्व शेअर बाजार पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे धडाधड कोसळले. निवडून आल्यानंतर ट्रम्प यांनी जो काही धुमधडाका लावलेला आहे. त्यामुळे त्यांच्या म्हणण्यानुसार अमेरिकेतील बेरोजगारी आणि कामगाराचे काम करणाऱ्यांना नोकरी मिळेल किंवा मिळू शकेल. अर्थात ती जेव्हा मिळेल तेव्हा मिळेल. पण तोपर्यंत अमेरिकेसह जगभरात वाढत असलेल्या महागाईने सर्वत्र जो काही गदारोळ माजलेला आहे. त्याला तोड नाही. ट्रम्प यांच्या डोक्यात काय काय भरलेले आहे. हे ट्रम्प यांनी आधीच सांगून टाकलेले होते. त्यांच्या 'अमेरिका फर्स्ट' या नाऱ्यामुळे अमेरिकेसह सर्वत्र यापूर्वी कधीच झाला नसेल असा गोंधळ उडालेला आहे. जगाचे जाऊ द्या. आपल्या भारतात आज सकाळी शेअर बाजार प्रचंड मोठ्या अंकांनी घसरला. सुरुवातीलाच 300 हून अधिक अंक उणे झाले. निफ्टी सुद्धा चौदाशे अंकांनी घसरला. पण बाजार बंद होताना सावरला असला. तरी सेन्सेक्स 2226 तर निफ्टी 346 अंकांनी घसरलेलीच आहे. अमेरिकन दादा ट्रम्प यांच्या घिसाडघाईमुळे जगात व्यापारयुद्ध वाढत आहे. अमेरिकेत मंदी येईल या भीतीमुळे आज भारतीय शेअर बाजारात जो काही प्रचंड हाहाकार माजलेला आहे. तो अभूतपूर्व आहे. अमेरिकेच्या दादागिरीला उत्तर देताना चीननेही जशास तशी कारवाई केली. या सर्व गोष्टींमुळे आज भारतातील गुंतवणूकदारांच्या संपत्तीत अवघ्या एका दिवसात 16 लाख कोटी रुपयांची घट झालेली आहे. ही फार मोठी नुकसानीची गोष्ट आहे. गेल्या अनेक वर्षात एकाच दिवशी एवढी मोठी मोठी घट झालेली नव्हती. त्यामुळे निश्चितच गुंतवणूकदारांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. शेअर्समध्ये मोठीच घसरण झाली कारण व्यवहार बंद झाला तेव्हा शेअर बाजारचा सेन्सेक्स 73137 वर बंद झाला आणि सूचीबद्ध कंपन्यांचे भांडवल म्हणजेच निफ्टी 22161 इतके घसरलेलेच आहे. ही खरोखरच फार मोठी गोष्ट आहे. फार मोठे नुकसान आहे. सर्वच शेअर्स आज घसरले. टाटा स्टीलमध्येही प्रचंड घसरण झालेली आहे. इतरही अनेक घोडदौड करीत असलेले शेअर पार आपटून गेलेले आहेत. अमेरिकेने चीनी निर्यातीवर 54% कर आकारला म्हणजे लादला. तर अमेरिकन आयातीवर उत्तरादाखल चीनने 34% कर लादलेला आहे. अनेक दुर्मिळ धातूंच्या नियार्तीवर बंदी घातलेली आहे. ट्रम्प यांच्या अशा धोरणामुळे अमेरिकेला किती फायदा होईल. हे ट्रम्प यांनाच माहीत असेल. पण अमेरिकेत महागाई वाढते आहे. हे दिसल्यामुळे ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर निदर्शने होत आहेत. अमेरिकेच्या जवळपास 50 राज्यातील लोक आज रस्त्यावर उतरलेले आहेत. आपल्या देशात आयटी, ऑटोमोबाईल, धातू , औषध, ऊर्जा यांच्या पायाभूत सुविधांमध्ये जवळजवळ 60 टक्क्यांनी घट झालेली आहे. सध्या क्रूड ऑइल म्हणजे कच्च्या तेलाच्या किमती घसरलेल्या आहेत. मात्र, आपल्या सरकारने पेट्रोलचे दर कमी न करता प्रति लिटर दोन रुपये एक्साईज ड्युटी म्हणजे अबकारी कर वाढवलेला आहे. या धोरणामुळे कमी झालेल्या दराचा उपभोक्त्यांना लाभ मिळण्याऐवजी या सरकारी अबकारी करामुळे सरकारच्या खजिन्यात मोठ्या प्रमाणावर वाढ होईल. कराचा फटका सर्वसामान्यांना बसणार हे सूर्यप्रकाशा इतके स्वच्छ आहे. शेअर बाजारातील या सर्व घडामोडींमुळे अनेक गुंतवणूकदारांचे जे नुकसान झालेले आहे. त्यामुळे आपल्या देशात अत्यंत तणावपूर्ण आणि चिंतेचे वातावरण निर्माण झालेले आहे. आता आरबीआयला व्याजदरात कपात करण्याशिवाय गत्यंतर नाही असे दिसते. शेअर बाजारातील ही उलथापालथ खऱ्या अर्थाने छोट्या गुंतवणूकदारांसाठी मोठीच आपत्ती ठरणार आहे. गेल्या काही वर्षात गुंतवणूकदारांनी बँकांपेक्षा शेअर बाजारात रक्कम गुंतवणूक करणे सुरू केले. त्याचा त्यांना फायदाही मिळाला. पण आता मिळालेल्या फायद्याला टिकवून ठेवणे जड झालेले दिसते. येत्या दोन-तीन दिवसात आणखी घसरण झाली नाही. तरी गुंतवणूकदारांना सावरण्यासाठी कोणाजवळ काही फारसे उपाय आहेत असेही दिसत नाही. या घसरणीबरोबर गॅसच्या दरात चक्क पन्नास रुपयाची वाढ झालेली आहे. विशेष म्हणजे घरगुती गॅस आणि सरकारी योजनेच्या गॅस मध्येही हीच पन्नास रुपयाची वाढ कायम आहे. यामुळे आता जनसामान्य उपभोक्त्यांनाही चांगलाच फटका बसणार आहे. अमेरिकेसारख्या देशाने अमेरिका फर्स्ट च्या नाऱ्यानंतर 'आपण फर्स्ट आणि सर्व जग लास्ट' असे ठरवलेले आहे असे दिसते. ट्रम्प यांची ही नीती व्यापार युद्धात अमेरिकेसाठी किती फायद्याची ठरेल? हे भविष्यकाळच सांगू शकेल. भारताला झळा पोहोचण्यास मात्र सुरुवात झालेली आहे. भविष्याच्या पोटात काय दडलेले आहे हे ट्रम्प यांनाच ठाऊक असेल. तोपर्यंत तुका म्हणे उगी रहा, जे जे होईल ते ते पहा. हेच खरे!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# दिव्यांगांच्या रोजगारासाठी धोरण आणणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**दिव्यांगासाठी जिल्हा वार्षिक योजनेत एक टक्का निधी**
राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी जिल्हा वार्षिक योजनेत सन २०२५-२६ पासून प्रत्येक वर्षी नियमित योजनांसाठी अनुज्ञेय असलेल्या निधीमधून कमाल १ टक्का निधी राखीव ठेवण्यात येणार आहे. या निधीमधून दिव्यांगांसाठीच्या सर्व सोयी सुविधा एका छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा दिव्यांग भवन उभारण्यात येईल, अशी माहिती फडणवीस यांनी यावेळी दिली

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :
राज्यातील दिव्यांगाना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असून त्यांना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.दिव्यांगाच्या रोजगारासाठी धोरण तयार करण्यात येणार असून त्याबाबत रोजगार व स्टॉलचे धोरण तयार करण्याचे निर्देश कौशल्य विकास आणि उद्योग विभागाला दिल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे दिली.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथिगृह येथे दिव्यांग बांधवांच्या विविध समस्यांबाबत बैठक पार पडली. यावेळी, जन्मजात किंवा काही कारणास्तव दिव्यांगत्व आलेल्या दिव्यांग बांधवांना आयुष्य जगत असताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. दिव्यांगत्वावर मात करीत आपल्या जीवनात उत्कर्षाचा मार्ग शोधावा लागतो. अशा दिव्यांग बांधवांच्या आयुष्यात समृद्धी निर्माण करण्यासाठी कालसुसंगत नवनवीन योजना, धोरणांची निर्मिती करण्याचे निर्देश देत फडणवीस यांनी या धोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही दिल्या.

राज्यातील दिव्यांग बांधवांना अधिक सुलभतेने लाभ मिळावा यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असून, लाडकी बहीण योजनेप्रमाणे दिव्यांग बांधवांचे अर्थसहाय्य थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

दिव्यांग लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य वाढवण्याबाबतही सरकार सकारात्मक असून दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे फडणवीस म्हणाले.

राज्यातील दिव्यांग नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष सहाय्य योजनेचे अर्थसाहाय्य थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाले पाहिजे. ज्या लाभार्थ्यांचे बँक खाते आधार लिंक झाले नाही, अशांसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी कालबद्ध कार्यक्रम हाती घ्यावा. योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी डीबीटी प्रणालीचा अवलंब करणे गरजेचे आहे, असे फडणवीस म्हणाले.

दिव्यांग सर्वेक्षण आणि प्रमाणपत्रासाठी एक विशेष मोहीम राबविण्यात यावी. दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र नसल्यामुळे शासकीय योजना, सवलती, शिक्षण, नोकरी आणि आरोग्यविषयक सुविधा मिळण्यासाठी अडचणी येतात. यासाठी आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागाने दिव्यांग प्रमाणपत्र वाटपासाठी विशेष मोहीम राबवावी. दिव्यांग ंना हक्काचा निवारा मिळावा यासाठी राज्य सरकार स्वतंत्र घरकुल योजना तयार करणार आहे. ज्यांच्याकडे स्वतःची जमीन नाही, अशा लाभार्थ्यांना घर बांधण्यासाठी जागेसाठीही सरकार मदत करणार असल्याचे फडणवीस म्हणाले.

# भडका !



घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत ५० रुपयांची वाढ

**आजपासून नवीन किमती लागू : राज्यात सिलिंडर ८५२ रुपये**

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ७ :
घरगुती गॅस सिलिंडर ५० रुपयांनी महाग झाला आहे. आज सोमवार ७ एप्रिल रोजी पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी ही माहिती दिली.

सध्या दिल्लीत गॅस सिलिंडर ८०३ रुपयांना उपलब्ध आहे. किमती वाढल्यानंतर ही किंमत ८५३ रुपये होईल. तर मुंबईत हीच किंमत आधी ८०२.५० रुपये होती, ती आता ८५२.५० रुपये होईल.

सरकारने शेवटच्या वेळी ८ मार्च २०२४ रोजी महिला दिनी सिलिंडरच्या किमतीत १०० रुपयांची कपात केली होती. त्यावेळी दिल्लीत सिलिंडरची किंमत ९०३ रुपये होती.

पेट्रोलियम मंत्र्यांनी सांगितले की, किमतीपेक्षा कमी किमतीत सिलिंडर विकल्यामुळे तेल विपणन कंपन्यांना सुमारे ४१,००० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. हे नुकसान कमी करण्यासाठी, किंमती वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला.

१ एप्रिल रोजी तेल विपणन कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतीत ४४.५० रुपयांची कपात केली होती. दिल्लीत त्याची किंमत ४१ रूपयांनी कमी होऊन १७६२ रूपये झाली. पूर्वी ते १८०३ रूपयांमध्ये उपलब्ध होते. कोलकातामध्ये ते ४४.५० ने कमी होऊन १८६८.५० रुपयांना मिळत आहे, पूर्वी त्याची किंमत १९१३ रूपये होती.

मुंबईत सिलिंडरची किंमत १७५५.५० रुपयांवरून ४२ रुपयांनी कमी होऊन १७१३.५० रुपये झाली आहे. चेन्नईमध्ये सिलिंडर १९२१.५० रूपयांमध्ये उपलब्ध आहे. तथापि, १४.२ किलोच्या घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. हे दिल्लीमध्ये ८०३ आणि मुंबईत ८०२.५० मध्ये उपलब्ध आहे.

तेल कंपन्या दर महिन्याला एलपीजीची मूळ किंमत मागील महिन्याच्या आंतरराष्ट्रीय किमती, विनिमय दर आणि इतर खर्चाच्या आधारे निश्चित करतात. यानंतर, कर, वाहतूक आणि डीलर कमिशन जोडून किरकोळ किंमत मोजली जाते. अनुदानित सिलिंडरसाठी, सरकार फरकाची भरपाई करते, तर विनाअनुदानित सिलिंडरसाठी, ग्राहक पूर्ण किंमत देतो.

## राज्य सरकारला हायकोर्टाचा दणका

### पोलिसांवर तातडीने गुन्हे दाखल करण्याचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :
बदलापूर प्रकरणातील अक्षय शिंदे बनावट एन्काऊंटर प्रकरणी उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दणका दिला आहे.

या प्रकरणी संबंधित पोलिसांवर गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित करा, असे आदेश मुंबई हायकोर्टाने दिलेत. अक्षय शिंदेच्या वडिलांनी पोलिसांवर आरोप करत याचिका दाखल केली होती. त्यावर हायकोर्टाने निकाल देताना हे आदेश दिले आहेत.

**अक्षय शिंदे बनावट एन्काऊंटर**



अक्षय शिंदे बनावट एन्काऊंटर प्रकरणी मुंबई हायकोर्टात सुनावणी झाली. या सुनावणीत आज मुंबई हायकोर्टाने आदेश जारी केले आहेत.मुंबई गुन्हे शाखेचे लखमी गौतम यांच्या नेतृत्वात हा तपास केला जाणार आहे.

अक्षय शिंदे एन्काऊंटर प्रकरणातील ज्या पोलिसांवर आरोप होते, त्या पोलिस अधिकाऱ्यांवर मॅजिस्ट्रेट कोर्टाने एक अहवाल तयार केला होता. त्यात पोलिसांवर ठपका ठेवण्यात आला होता.

राज्य सरकारने त्यातील एका विशिष्ट भागाला आव्हान दिले होते. मात्र, ते सुद्धा फेटाळून लावण्यात आले आहे. या प्रकरणातील पाच पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश हायकोर्टाने दिले आहेत. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि गोखले यांच्या खंडपीठाने हे आदेश जारी केले आहेत.

मुंबई पोलिस सहआयुक्त गुन्हे यांना या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अक्षय शिंदेचे वडील अण्णा शिंदे यांनी पोलिसांवर कारवाईची मागणी करत याचिका दाखल केली होती.

## सेन्सेक्स ३९३९ अंक घसरून १७१२ अंकांनी सावरला

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :




शेअर बाजारात आज सोमवार ७ एप्रिल रोजी वर्षातील दुसरी सर्वात मोठी घसरण दिसून आली. सेन्सेक्स २२२६ अंकांनी (२.९५%) घसरून ७३,१३७ वर बंद झाला. निफ्टी ७४२ अंकांनी (३.२४%) घसरून २२,१६१ वर बंद झाला. यापूर्वी ४ जून २०२४ रोजी बाजार ५.७४% ने घसरला होता.

सेन्सेक्सच्या ३० पैकी २९ समभागांमध्ये घसरण झाली. टाटा स्टील, टाटा मोटर्स आणि लार्सन अँड टुब्रोचे शेअर्स ७% पर्यंत घसरले. झोमॅटोचे शेअर्स ०.१७% वाढून बंद झाले. एनएसई क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये, निफ्टी मेटलमध्ये सर्वाधिक ६.७५% घसरण झाली. रिअल्टी ५.६९% ने घसरली. ऑटो, फार्मा, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, तेल आणि वायू आणि आयटी क्षेत्रे ४% घसरून बंद झाली. २ एप्रिलपासून कच्च्या तेलाच्या किमतीत १२.११% घट झाली आहे. आज, ब्रेंट क्रूड ४% ने घसरला आहे आणि $६४ च्या खाली घसरला आहे. गेल्या ४ वर्षांतील ही सर्वात कमी पातळी आहे.

## उत्पादन शुल्क २ रुपये वाढले पेट्रोल-डिझेल महागणार नाही

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :
केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रति लिटर २ रुपयांची वाढ केली आहे. तथापि, अर्ध्या तासानंतर असेही स्पष्ट करण्यात आले की यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढणार नाहीत. हा खर्च पेट्रोलियम कंपन्यांकडून उचलला जाईल.

सध्या सरकार पेट्रोलवर प्रति लिटर १९.९० रुपये आणि डिझेलवर प्रति लिटर १५.८० रुपये उत्पादन शुल्क वसूल करत आहे. या वाढीनंतर पेट्रोलवर प्रति लिटर २१.९० रुपये आणि डिझेलवर प्रति लिटर १७.८० रुपये शुल्क आकारले जाईल. पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी म्हणाले की, कच्च्या तेलाच्या कमी झालेल्या किमतींनुसार शुल्क समायोजित केले जाईल. जर कच्च्या तेलाच्या किमतीत आणखी घसरण होत राहिली तर पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी होऊ शकतात.

## वक्फ कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाची सहमती




■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :
वक्फ कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी सहमती दर्शवली.

सरन्यायाधीश संजीव खन्ना म्हणाले, मी दुपारी याचिकेचे उल्लेख पत्र पाहीन आणि निर्णय घेईन. आम्ही त्याची यादी करू.

ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात विनंती केली होती की जमियत उलेमा-ए-हिंद आणि इतर संघटनांनी दाखल केलेल्या याचिका खूप महत्त्वाच्या आहेत आणि त्यांना प्राधान्य दिले पाहिजे. त्याच वेळी, आज राष्ट्रीय जनता दलाने नवीन वक्फ कायद्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. आतापर्यंत सर्वोच्च न्यायालयात ६ याचिका दाखल झाल्या आहेत.

## डॉक्टर सुश्रुत घैसास यांचा राजीनामा

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ७ :
पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे वादग्रस्त डॉक्टर सुश्रुत घैसास यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. ते तनिषा भिसे मृत्यूप्रकरणी वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. त्यांच्यावर टीकेची चौफेर झोड उठत होती. अखेर या प्रकरणी राज्य सरकारच्या समितीचा अहवाल सादर झाल्यानंतर त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

तनिषा भिसे नामक गरोदर महिलेला दीनानाथ रुग्णालयात गंभीर स्थितीत प्रसूतीसाठी आणण्यात आले होते. पण रुग्णालय प्रशासनाने त्यांना 10 लाखांचे डिपॉझिट भरल्यानंतरच दाखल करून घेण्याची भूमिका घेतली होती. यासंबंधीच्या रिसिप्टवर डॉक्टर सुश्रुत घैसास यांची स्वाक्षरी होती. त्यामुळे त्यांच्यावर चौफेर टीकेची झोड उठली होती.

या प्रकरणी सत्ताधारी महायुतीसह विरोधी बाकावरील महाविकास आघाडीच्या सर्वच घटकपक्षांनी दीनानाथ रुग्णालयाबाहेर निदर्शने केली होती. त्यानंतर सरकारनेही या प्रकरणी चौकशी समिती स्थापन करून जनतेचा रोष कमी करण्याचा प्रयत्न केला. या समितीचा सोमवारी अहवाल आला. त्यानंतर काही तासांतच डॉक्टर घैसास यांनी दीनानाथ रुग्णालयातील आपल्या पदाचा राजीनामा दिला.

डॉक्टर सुश्रुत घैसास हे दीनानाथ रुग्णालयातील अत्यंत अनुभवी व कुशल डॉक्टर म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या विरोधात झालेले आरोप तथा त्यानंतर वैयक्तिक आणि व्यावसायिक पातळीवर निर्माण झालेला ताण-तणाव आणि रुग्णालयाच्या प्रतिमेला झालेली हानी लक्षात घेता त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देणे पसंत केले.

## कुणाल कामराला मोठा दिलासा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :
स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराला मद्रास उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. मुंबई पोलिसांच्या एफआयआरमध्ये कुणाल कामराला देण्यात आलेले अंतरिम संरक्षण न्यायालयाने 17 एप्रिलपर्यंत वाढवले आहे.

मुंबईतील खार पोलिसांनी कुणाल कामराविरोधात एफआयआर नोंदवला होता. मद्रास उच्च न्यायालयाने मागील सुनावणीत कामराला 7 एप्रिलपर्यंत अटकेपासून अंतरिम संरक्षण दिले होते. त्यानंतर आज यामध्ये वाढ करण्यात आली आहे. कुणाल कामराने त्याच्या 'नया भारत' शोमध्ये एका गाण्याचे विडंबन करत त्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना 'देशद्रोही' म्हटले होते. शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी कुणाल कामराच्या स्टुडिओची तोडफोड केली होती.

## कोरटकरच्या जामीन अर्जावर सुनावणी संपली न्यायालय ९ एप्रिला देणार निर्णय

■ वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. ७ :
इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत धमकी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान प्रकरणी प्रशांत कोरटकर सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. सहा दिवसांपूर्वी कोल्हापूर न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला होता.

त्यावर कोरटकर याने जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जावर आज सुनावणी झाली. जिल्हा व सत्र न्यायाधीश डी. व्ही. कश्यप यांच्यासमोर सुनावणी झाली असून जामिनाबाबतचा निर्णय परवा दिला जाणार असल्याचे सांगितले. त्यामुळे प्रशांत कोरटकरचा कारागृहातील मुक्काम 9 एप्रिलपर्यंत वाढला आहे.

प्रशांत कोरटकरच्या जामीन अर्जावर सुनावणी झाल्यानंतर इंद्रजीत सावंत यांचे वकील अॅड. असीम सरोदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. या प्रकरणाचा अद्याप तपास पूर्ण झाला नाही, तसे पोलिसांनीही लेखी लिहून दिले आहे.

## मोठेपणासाठी रडू नका म्हणत शोभाताई फडणवीसांनी मुनगंटीवारांना सुनावले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :
भाजपच्या स्थापना दिनानिमित्त चंद्रपुरात मुनगंटीवार समर्थक आणि चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार यांनी दोन स्वतंत्र कार्यक्रमांचे आयोजन केले होते, यावरुन मुख्यमंत्र्यांच्या काकू शोभाताई फडणवीस यांनी सुधीर मुनगंटीवार यांचे नाव न घेता त्यांना सुनावले आहे.

मुनगंटीवार यांनी आमदार जोरगेवार यांच्या कार्यक्रमाला तर जोरगेवार यांनी कन्यका सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमाकडे पाठ फिरवली. यामुळे चंद्रपूर भाजपमधील अंतर्गत गटबाजी प्रकर्षाने दिसून आली. अशातच पक्षातील या गटबाजीवर शोभाताई फडणवीस यांनी बोट ठेवत जाहीरपणे आपली तीव्र नाराजी बोलून दाखवली आहे.



शोभाताई फडणवीस म्हणाल्या की, भाजपच्या स्थापना दिनानिमित्त चंद्रपुरात काल दोन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. केंद्रात आणि राज्यात सत्ता असताना चंद्रपूर जिल्ह्यात भांडण व्हावी. आज या ठिकाणी एवढा मोठा मेळावा आहे, का मोठ्या मनाने समोर येत नाही. का दुसरा मेळावा घेताऊ याच्यामध्ये लोकांच्या मनात काय निर्माण होईल. अरे (किशोर जोरगेवार) हे चंद्रपूरचे आमदार आहेत, चंद्रपूरमध्ये कार्यक्रम घेणं त्यांचे काम आहे. सर्वांनी मोठेपणा देऊन कार्यक्रमाला हजर राहणं गरजेचे होते.

शोभाताई फडणवीस पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, लोकं आपल्या पक्षात यायला तयार आहेत. लोकांची झुंबड पक्षात येण्यासाठी वाटली आहे. पण इथे जर आपली भांडण झाली तर लोकं आपली काँग्रेस झाली असे म्हणणार नाही का? असे विचारत त्यांनी नाव न घेता माजी मंत्री यांना सुनावले आहे. यावरून भाजपात गटबाजी असल्याची चर्चा आहे.

# संगीत विद्यालय, स्वरकुंज लाखाळा येथे श्रीरामनवमी उत्साहात साजरी

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम**- स्वरकुंज संगीत विद्यालय, प्रोफेसर कॉलनी लाखाळा वाशिम. येथे श्रीराम नवमी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी स्वरकुंज संगीत विद्यालयाचे संचालक प्रा. सुमित



खासभागे सर आणि सहसंचालिका प्रा. सो मोहिनी खासभागे मॅडम या- च्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी गायन वादनाद्वारे प्रभू श्रीरामांच्या चरणी आपली सेवा सादर केली. या भक्तिमय वातावरणाने संपूर्ण विद्यालयाचा परिसर भक्तिमय झाला होता. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गायन वादनाने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अखेर परमेश्वर अंभोरे यांच्या आमरण उपोषणाची सांगता

▶ महासागर प्रतिनिधी ▶

वाशिम - सत्यमेव जयते फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष परमेश्वर अंभोरे यांनी सावरगाव येथील विविध समस्या सोडविण्यासाठी ५ एप्रिलला सावरगावं येथील लुबिनी कृषी पर्यटन येथे आमरण उपोषनास सुरुवात केली. खासदार संजय देशमुख यांनी उपोषणाची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून विकास कामाना गती देण्याची मागणी केली.



## खासदार संजय देशमुख यांचा पुढाकार

खासदार संजय देशमुख यांच्या पुढाकाराणे परमेश्वर अंभोरे यांच्या मागण्या त्वरित मान्य करण्यात येऊन त्याबाबत त्यांना अधिकाऱ्याकडून लेखी आश्वासन देण्यात आल्याने अखेर शिवसेना उबाठा पदाधिका?यांच्या हस्ते त्यांनी निंबू पाणी पिऊन आमरण उपोषणाची सांगता केली. खासदार संजय देशमुख यांनी जिल्हा प्रशासनाला पाठवलेल्या पत्रात नमूद केले कि, परमेश्वर अंभोरे यांनी केलेल्या मागण्या न्याय व गावाच्या विकासासाठी आहेत आहेत. सावरगाव जिरे येथील जिल्हा परिषद शाळेच्या खोल्यांचे नूतनीकरण करण्यात यावे

शाळेतील तीन वर्गखोल्या मागील १०० वर्षांपासून जुन्या असून, त्या अत्यंत जीर्ण झालेल्या आहेत. याबाबत अंभोरे यांनी जून २०२४ मध्ये आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. त्यानंतर जिल्हा परिषदेने ३३ लाख रुपयांचा (नियतव्यय) निधी मंजूर केला आहे, मात्र आजतागायत बांधकामास सुरुवात झालेली नाही. हे काम तात्काळ सुरू करण्यात यावे, सावरगाव जिरे ते येवती रस्त्यावरील नाल्यावर मंजूर कोल्हापूर बंधा?याच्या कामासाठी रु. १,४५,५०,०२४/- चा खर्च दाखवलेला असून, त्याचे भूमिपूजन सुद्धा पूर्ण झाले आहे. परंतु प्रत्यक्षात कामास सुरुवात झालेली नाही. हे काम जलसंधारण विभाग, मृद व जलसंधारण कार्यालय, वाशिम यांच्या कार्यक्षेत्रात येते. संबंधित विभागाने तात्काळ कार्यारंभ आदेश दयावा. सावरगाव जिरे ते येवती व सावरगाव जिरे ते पिंपरी रस्त्याचे पुनर्निर्माण करण्यात यावे. या मार्गावर असलेला फाटा पिंपरी गावाला जाणारा रस्ता सध्या नकाशावरच उरला आहे आणि प्रत्यक्षात अस्तित्वात नाही. तसेच सावरगाव जिरे ते रेवती आणि सावरगाव जिरे ते पिंपरी या दोन्ही गावांना जोडणारे रस्ते विकास निधीतून तात्काळ मंजूर करून काम सुरू करावे. सावरगाव जिरे ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतीसाठी निधी मंजूर करण्यात यावा. सदर ग्रामपंचायत कार्यालय सध्या अतीशय मोडकळीस आलेले असून नवीन इमारतीसाठी निधीची नितांत आवश्यकता आहे. तरी, या कार्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा, वरील सर्व मागण्या अत्यंत रास्त असून, त्या संबंधित विभागांनी तातडीने मार्गी लावाव्यात जेणेकरून गावातील जनतेचे उपोषण थांबवता येईल आणि विकासाला गती मिळेल. खासदार संजय देशमुख यांच्या पत्राने जिल्हा प्रशासनाने दखल घेत परमेश्वर अंभोरे यांच्या सर्वच मागण्या मान्य केल्या आहेत.

# १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त निबंध स्पर्धा

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन प्राथमिक शिक्षक पर्यावरण मंडळ व रिसोड तालुका पत्रकार संघाच्या वतीने करण्यात येत आहे.

या निबंध स्पर्धेचा विषय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान विषयक अनमोल कार्य वरील दोन विषयापैकी कोणत्याही एका विषयावर जिल्ह्यातील इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी निबंध लिहून दिनांक १४ एप्रिल २०२५ पर्यंत दिलीप माधवराव गाडे, दशरथ नंदन निवास, समर्थ नगर, तहसील कार्यालयाच्या बाजूला, रिसोड



तालुका रिसोड जिल्हा वाशिम या पत्त्यावर पाठवावेत. विद्यार्थ्यांनी सदर निबंध लिहिल्यानंतर त्यावर आपल्या शाळेचे मुख्याध्यापक यांचे सही व शिक्का घेऊन सदर निबंध पाठवावा. सदर निबंध स्पर्धेचे बक्षीस हे वाशिम जि.प.शिक्षक पतसंस्था उपाध्यक्ष विजय मनवर यांचेकडून प्रथम क्रमांकाचे रुपये २१००/ आणि भारतीय संविधान. सतीश घुगे यांचेकडून दुसरे क्रमांकाचे बक्षीस रुपये ११००/ आणि भारतीय संविधान. तिसरे क्रमांकाचे बक्षीस

राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त अर्जुन वरघट रू. यांचेकडून रुपये १०००/आणि भारतीय संविधान तसेच सर्व क्रमांक प्राप्त स्पर्धकांना प्रमाणपत्र असे बक्षिसाचे स्वरूप राहील. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन निबंध पाठवावेत असे आवाहन पर्यावरण मंडळाचे वाशिम शिक्षक पतसंस्था संचालक सतीश घुगे, दिलीप गाडे, अर्जुन वरघट, विवेक वानखेडे, प्रदीप जाधव, संतोष मोरे, रिसोड तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सतीश मांदळे यांच्या वतीने आवाहन केले आहे.

# वातावरण भंग करणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल

## रिसोड पोलीसांची कारवाई

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - शहरातील मालेगाव नाका परिसरात गैर कायदेशीर मंडळी जमून सार्वजनिक ठिकाणी हैदोस घालून वातावरण भंग करणाऱ्या सहा जणाविरुद्ध रिसोड पोलीस स्टेशन मध्ये चार एप्रिलला सायंकाळी सव्वा दहा वाजता गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रिसोड शहरातील मालेगाव नाका परिसरात सार्वजनिक ठिकाणी ४ एप्रिल ला सायंकाळी सव्वा दहा वाजता काही युवक गैर कायदेशीर मंडळी जमून आपापसात भांडणे व जोर जोराने आवाज करून परिसरातील वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न करीत होते. यावेळी रिसोड पोलीस स्टेशनच्या वतीने रात्रीचे ग्रस्त सुरू असताना सदर प्रकार उघडकीस आला.

सार्वजनिक ठिकाणी हैदोस घालून आपापसात भांडणे व जोरजोराने आवाज केल्यामुळे आरोपी रवी टापरे, अजय चतरकर राहणार बेंदरवाडी तसेच कालू शहा पठाण, शाहरुख शेख रहीम, सैय्यद नजीम सैय्यद कबीर, शेख सलमान अहमद नूर सर्व राहणार अमरदास नगर व इतर दहा ते पंधरा युवक यांच्या विरोधात सरकारी पक्षातर्फे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अशोक गीते यांच्या फिर्यादीवरून कलम १९४(२), १८९ (२) भारतीय न्याय संहिता कायदे अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवचरण डोंगरे व रिसोड पोलीस करीत आहेत.

# इंग्रजी भाषा म्हणजे स्पर्धा परीक्षेचा आत्मा - रवि सपकाळ यांचे प्रतिपादन

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मालेगाव**- इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा असून त्या भाषेला आज अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले असून इंग्रजी भाषा ज्ञानाचे भांडार असून ती भाषा म्हणजे सर्व स्पर्धा परीक्षांचा आत्मा आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही असे प्रतिपादन अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे वाशिम तालुका सचिव रवी सपकाळ यांनी केले.

ते रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालय मालेगावच्या इंग्रजी विभागाच्या वतीने आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत बोलताना सांगितले. इंग्रजी भाषेचे स्पर्धा परीक्षेमध्ये महत्त्व या विषयावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून भाष्य करीत



होते. ते. पुढे म्हणाले की इंग्रजी ही जागतिक स्तरावर बोलली जाणारी भाषा असून अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये इंग्रजीचा वापर अनिवार्य असतो. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवून स्पर्धा परीक्षांमध्ये आपल्या बुद्धीचा किरण पाडून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनमार्गाचे जडण घडण करावे असे आव्हान त्यांनी विद्यार्थ्यांना केले. ते पुढे म्हणाले की इंग्रजी भाषेच्या ज्ञानामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर संवाद साधता येतो व त्यांना शैक्षणिक सुयश प्राप्त होते व विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशवंत होऊन नोकरीच्या संधी प्राप्त होतात. त्या संधीचे त्यांनी सोने करून स्वतःचे व महाविद्यालयाचे नाव रोशन करण्याचा मूलमंत्र त्यांनी उपस्थितांना दिला या कार्यक्रमाच्या अध्यक्षा ग्रामपंचायत कोकलगांवच्या ग्रामसेविका वैशाली सपकाळ यांनी स्पर्धा परीक्षा व इंग्रजी या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेच्या ज्ञानाचे भांडार वाढवून जीवनात हिमालयाची उंची गाठावी व सर्वांगीण उत्कर्ष करून व्यक्तिमत्त्व विकास साधावा असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमात इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. भिमराव जांभरुणकर यांनी या कार्यशाळेच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होऊन इंग्रजी संवाद कौशल्य वाढीस लागेल असा विश्वास व्यक्त केला. प्रा. डॉ. दिपक जमधाडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

**रामराव झनक महाविद्यालयात कार्यशाळा उत्साहात**

कार्यकमाता विशाखा जाणकर, विजय मनावर जि.प. शिक्षक पतसंस्था उपाध्यक्ष वाशिम, राजेंद्र साळवे उद्योजक वाशिम, डॉ विनोद रत्नीपारखी, जावेद बागान उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु विजयाने केले तर आभार प्रदर्शन ऋतुराजने केले कार्यक्रमाची सुरुवात विल्यम शेक्सपियर यांच्या प्रतिमेची पूजनाने झाली. रवी सपकाळ यांचा इंग्रजी विभागाच्या वतीने पुष्पहार, संविधानाचा फोटो व वृक्ष भेट देवून सरकार करण्यात आला.

# डॉ. निखिल डहाळके यांचा सत्कार एमबीबीएस मध्ये प्राविण्य



▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - अनंत नागरी सहकारी पत संस्था रिसोडचे संचालक सुनील डहाळके यांच्या मुलगा निखिल सुनील डहाळके यांनी एमबीबीएस मध्ये प्राविण्य प्राप्त केल्याबद्दल अनंत नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे निखिल डहाळके यांचा सत्कार करण्यात आला.

त्याने नीट परीक्षेमध्ये ५८० गुण प्राप्त करून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय लातूर येथे प्रवेश मिळाला होता. एमबीबीएस पदवी प्राप्त केल्याबद्दल संस्थेच्या वतीने शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला सुनील डहाळके हे सुद्धा शिक्षक असून त्यांच्या मुलांनी यश मिळवल्याबद्दल त्यांचा सुद्धा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष तानाजीराव रंजवे, उपाध्यक्ष डी के देशमुख, मोहनराव देशमुख, सुनील डहाळके, डॉ. नंदकिशोर रजवे, गजानन जाधव हरिदास बोरुडे, नंदकिशोर गायकवाड, सुहास जोगदंड, दिलीप देशपांडे यावेळी उपस्थित होते, यापुढे २ वर्ष इंटरशिप करून M. D. करण्याचा मानस यावेळी व्यक्त केला. त्याच्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अवैध रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परवर कारवाई



▶ महासागर प्रतिनिधी ▶ **रिसोड** - अवैधरित्या विनापरवाना रेती वाहतूक करणाऱ्या एका टिप्पर वर दिनांक ५ एप्रिल रोजी रात्री दहा वाजता दरम्यान रिसोड महसूल प्रशासनाने कारवाई करून सदर टिप्पर रिसोड पोलीस स्टेशनला जमा केले आहे. तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना गोपनीय माहिती मिळाली की, रिसोड वाशिम मार्गावर टिप्पर च्या माध्यमातून पैनगंगा नदीतील रेती अवैधरित्या वाहतूक करून विक्री केली जात आहे.

सदर माहितीच्या आधारे तहसीलदार प्रतीक्षा तेजकर यांनी आपल्या अधिकारी व कर्मचा?यांना आदेशित करून सदर ठिकाणी पाठवले असता रिसोड वाशिम मार्गावर हराळ फाटावर टिप्पर क्रमांक एम एच ३७ टी ३९८० हा आढळून आला. महसूल कर्मचाऱ्यांनी त्यास रेतीच्या परवानाबद्दल विचारणा केली असता त्याच्या कोणताही रेती वाहतूक परवाना नसल्याने सदर टिप्पर रिसोड पोलीस स्टेशनला आणून त्याच्यावर कारवाई करण्यात आली. सदर कारवाई तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनात नायब तहसीलदार गजानन जवादे, महसूल सेवक गौरव वानखेडे, संतोष बोरकर, संतोष खाडे, हरीश मुठाळ यांनी केली.

# दि.जैन महासमिती सुवर्ण जयंती वर्षानिमित्त रक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबिर

▶ महासागर प्रतिनिधी ▶

कारंजा- जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून दि.जैन महासमिती च्या स्वर्ण जयंती वर्षानिमित्त दि. जैन महिला महासमिती कारंजा संभाग व कारंजा रक्तदान चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने सरस्वती भवन येथे दि,५ एप्रिलला रक्तदान शिबिर तथा सरकारी उपजिल्हा रुग्णालय कारंजा यांच्या विशेष सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले.

शिबिराचे उद्घाटन कारंजा - मानोरा विधानसभेच्या आमदार सईताई डहाके यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.. विजय रोम तर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राचल अध्यक्षा वर्षा काळे , कारंजा रक्तदान चळवळीचे प्रतिनिधी डॉ. सुशील देशपांडे ,वैदयकीय अधिक्षक डॉ. नथूराम सोळंके. संत गाडगेबाबा रक्तपेढीचे



संक्रमण अधिकारी डॉ. अनिल कविमंडल, महाराष्ट्रांचल कार्यकारीणी सदस्य विवेक फुलंबरकर, साने गुरुजी सेवा संघाचे तालुका सचिव नंदकिशोर भोयर, महाराष्ट्रांचल महामंत्री प्रणितताई फुरसुले, सरस्वती भवनचे अध्यक्ष सुमेरचंद्रआगरकर, सैतवाळ संस्थेचे तालुका सचिव कारंजा ईकाइ चे महामंत्री राहुल महात्मे, महावीर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष आनंद चवरे उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी बोलताना प्रमुख पाहुण्यांनी रक्तदानाचे महत्त्व सांगत नागरिकांनी त्यासाठी मोठ्या संख्येने पुढे येण्याचे आवाहन केले. तर आमदार सईताई डहाके यांनी दि. जैन महिला महासमितीच्या विविध उपक्रमाचे कौतुक करुन समितीचे कार्य महिलेसाठी प्रेरक असल्याचे सांगितले .या शिबिरात अनेक युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. एकूण ३५ रक्तदात्यांनी रक्तदानकेले. या शिबिरात महिलाच्या उत्सफुर्त प्रतिसाद मिळाला त्यात अमृता फुलंबरकर , सरिका मांडवगडे, सौ. स्वाती डावरे ,प्रणितताई फुरसुले, ह्या चार महिलांनी या शिबिरात रक्तदान करुन महिलेत रक्तदान बाबत जनजागृती केली. त्यांचाही प्रेरक सत्कार करण्यात आला .तसेच दुपारच्या सत्रात ७० महिला व पुरुष यांच्या मोफत आरोग्य तपासणी अंतर्गत विविध तपासण्या करण्यात आल्या.

शिबिर यशस्वी करण्यासाठी कारंजा संभाग अध्यक्षा सुलभा फुरसुले, महाराष्ट्रांचल उपाध्यक्षा अंजली काळे , सहमंत्री शुभांगी फुरसुले, कार्यकारीणी सदस्य रेखा चुंबळे व महासमितीच्या उपस्थित सर्व सदस्यांनी मोलाचे कार्य केले. कारंजा रक्तदान चळवळ प्रतिनिधी प्रज्वल गुलालकरी यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगिता शेंडेकर व पुरुष महाराष्ट्रांचल महिला प्रकोष्ठ जयश्री चाणेकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन कार्यकारीणी सदस्य हर्षा यांनी केले.

# एनसीसी विद्यार्थ्यांची अवयवदानासाठी जनजागृती मोहीम

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - येथील श्री बाकलीवाल विद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) विद्यार्थ्यांनी जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून अवयव दानाचे महत्त्व विशद केले. ११ महाराष्ट्र बटालियन अकोल्याचे कमांडिंग ऑफिसर कर्नल व्ही.एन. शुक्ला (व्हीएसएम) एडम ऑफिसर लेफ्टनंट कर्नल सुनील कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी ऑफिसर अमोल काळे यांच्या नेतृत्वात ६ एप्रिल, रविवार रोजी विद्यालयात 'अवयव दान श्रेष्ठ दान' या विषयावर पोस्टर्स स्पर्धा आयोजित करण्यात आली.



या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत प्रभावी चित्रे रेखाटली. कार्यक्रमानंतर सर्व एनसीसी विद्यार्थ्यांनी एकत्र येत अवयवदानाची प्रतिज्ञा घेतली. यावेळी बोलताना एनसीसी अधिकाऱ्यांनी सांगितले की, अवयव दान हे केवळ एक दान नाही, तर ते अनेक गरजू व्यक्तींना नवजीवन देणारे श्रेष्ठ कार्य आहे. भारतात दरवर्षी लाखो लोक अवयवांच्या प्रतीक्षेत असताना मृत्युमुखी पडतात. नॅशनल हेल्थ पोर्टलच्या आकडेवारीनुसार, सुमारे ५ लाख लोकांचा अवयव न मिळाल्याने मृत्यू होतो, ज्यामध्ये दोन लाख रुग्ण यकृत प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत असतात. एका व्यक्तीच्या अवयव दानाने एकाच वेळी आठ जणांना जीवनदान मिळू शकते, त्यामुळे अवयव दानाचे महत्त्व अनमोल आहे. या जनजागृती मोहिमेमध्ये आयोजित केलेल्या पोस्टर्स स्पर्धेत विघ्नेश वानखेडे याने प्रथम क्रमांक पटकावला, तर रजत कुटे याने द्वितीय आणि मनस्वी कोंढाणे हिने तृतीय क्रमांक मिळवला. यासोबतच शिवानी भुतकर, शिवम जाधव आणि पदयुम पवार यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात येणार आहेत. या उपक्रमाबद्दल बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. सुरेंद्रकुमार बाकलीवाल, शाळेचे मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दंभीवाल, पर्यवेक्षिका सौ. भोंडे आणि एनसीसी अधिकारी अमोल काळे यांनी सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांच्या विकासासाची जबाबदारी शिक्षक आणि पालकांची - प्रा. राजेश पाटिल ताले

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मानोरा**- पीएम श्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा विठोली, ता. मानोरा, जि. वाशिम येथे पी. एम. श्री योजने अंतर्गत विद्यार्थी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता प्रमुख मार्गदर्शक म्हणून जेसीआय इंडिया द्वारा आऊटस्टँडिंग यंग पर्सन ऑफ द इंडिया अवॉर्ड:-२०२४ चे विजेते, स्वामी विवेकानंद ग्रुप ऑफ ऑर्गनायझेशन चे अध्यक्ष, राष्ट्रीय व्याख्याते प्रा. राजेश पाटिल ताले उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषद माध्यमिक शाळा विठोली चे मुख्याध्यापक





संतोष काईट प्रमुख अतिथी मानोरा चे गटशिक्षणाधिकारी अनिल पवार साहेब, केंद्रप्रमुख चौधरी सर, मुख्याध्यापक अर्जुन लोंढे, ज्येष्ठ शिक्षक आरोळे सर, स्वामी विवेकानंद ग्रुप चे उपाध्यक्ष प्रतीक ताले व्यासपीठावर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आईवडील आपल्यासाठी जे कष्ट व मेहनत घेतात याची जाणीव ठेवावी. आपले आईवडील आणि आपल्या घरची परिस्थिती या दोन गोष्टी विद्यार्थ्यांनी सदैव लक्षात ठेवाव्या या दोन गोष्टी आपल्याला वाईट मार्गापासून नेहमी दूर ठेवतील. विद्यार्थ्यांसाठी आई वडील आणि शिक्षक हेच आजच्या काळात खरे आदर्श आहेत. आईवडील आणि शिक्षक आपल्याला जे संस्कार व विचार देतात ते विद्यार्थ्यांनी अंगिकारावे कारण आईवडिल हेच प्रत्येक विद्यार्थ्यांचे पहिले गुरू असतात असे मार्गदर्शन प्रा. राजेश पाटिल ताले यांनी चला देश घडवूया या विषयांवर बोलतांना केले. पीएम श्री जिल्हा परिषद शाळा विठोली आदर्श म्हणून नावारूपास येत आहे. वाशिम जिल्ह्याच्या शैक्षणिक विकाकासात पीएम श्री शाळा नक्कीच महत्वाची भूमिका बजावतील.

# हे आर्थिक मंदीचे लक्षण आहे का?

सोमवार, ७ एप्रिल रोजी शेअर बाजारात वर्षातील दुसरी सर्वात मोठी घसरण दिसून आली. यामुळे गुंतवणूकदारांचे सुमारे १९ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. जपान आणि हाँगकाँगसह इतर आशियाई बाजारपेठांमध्येही मोठी घसरण दिसून आली आहे. अशा परिस्थितीत या दिवसाला 'ब्लॅक मंडे' म्हटले जात आहे.

या घसरणीचे सर्वात मोठे कारण ट्रम्प यांचे परस्पर शुल्क आहे असे तज्ज्ञांचे मत आहे. २०२५ च्या अखेरीस अमेरिकेत आर्थिक मंदी येण्याचा अंदाज आहे.

आर्थिक मंदी म्हणजे दीर्घकाळासाठी कोणतीही गोष्ट मंदावणे किंवा मंदावणे. जेव्हा एखाद्या देशाची अर्थव्यवस्था सलग दोन-तीन तिमाहीत वाढण्याऐवजी घसरू लागते तेव्हा त्याला आर्थिक मंदी म्हणतात. एका वर्षात देशात उत्पादित होणाऱ्या सर्व वस्तू आणि सेवांच्या एकूण मूल्याला जीडीपी म्हणतात. जेव्हा जीडीपीचे आकडे घसरू लागतात तेव्हा देशावर मंदीचे ढग दाटू लागतात.

मंदीच्या परिस्थितीत महागाई आणि बेरोजगारी झपाट्याने वाढते. लोकांचे उत्पन्न कमी होऊ लागते. गुंतवणूकदार पैसे गुंतवण्यास घाबरत असल्याने शेअर बाजारात सतत घसरण होत आहे. जर अर्थव्यवस्था एका तिमाहीत घसरली, दुस?या तिमाहीत वाढू लागली आणि तिस?या तिमाहीत पुन्हा घसरली, तर त्याला मंदी म्हणता येणार नाही.

मंदी कधी येते? महागाई आणि मंदी यांच्यात काय संबंध आहे? याबाबत असे सांगता येईल की, समजा समोशाची किंमत वाढली. कदाचित तुम्ही समोसे खरेदी करणे थांबवावे. याचा समोसा विक्रेत्याच्या उत्पन्नावर परिणाम होईल, तो कमी समोसे बनवेल. याचा परिणाम बटाटे आणि तेल पुरवठा करणाऱ्यांवर होईल. अर्थव्यवस्थेत अशा अनेक परस्पर जोडलेल्या साखळ्या असतात.

या परस्पर जोडलेल्या साखळ्यांचा डोमिनो इफेक्ट देशात मंदी आणतो. हे एक दुष्टचक्र आहे, म्हणजेच, एक चक्र ज्यामध्ये गोष्टी एकमेकांशी जोडल्या जातात.

अर्थशास्त्रज्ञ आणि जेएनयूचे माजी प्राध्यापक अरुण कुमार स्पष्ट करतात की, जर एखाद्या गुंतवणूकदाराला असे वाटत असेल की भविष्यात अर्थव्यवस्था कोसळू शकते, तर तो गुंतवणूक कमी करतो किंवा थांबवतो. जेव्हा गुंतवणूक कमी असते तेव्हा मागणी कमी असते. मागणी कमी झाल्यामुळे वस्तूंच्या किमती वाढत नाहीत. उत्पादन कमी केल्याने पुरवठा कमी होतो. देशाची अर्थव्यवस्था आकुंचन पावेपर्यंत हे दुष्टचक्र चालू राहते.

आर्थिक मंदीचा सामान्य लोकांवर परिणाम होतो. जर एखाद्या देशाला मंदीचा फटका बसला तर त्याचे अनेक धोकादायक परिणाम होऊ शकतात. गुंतवणुकीचे वातावरण बिघडू शकते. वापर आणि विक्री कमी झाल्यामुळे अनेक कंपन्या बंद पडू शकतात. यामुळे नोकऱ्या कमी होतील. उत्पन्न कमी झाल्यामुळे सामान्य लोक आणि व्यावसायिक त्यांचे कर्ज फेडू शकणार नाहीत आणि बरेच लोक दिवाळखोरीतही जाऊ शकतात.

कोरोना साथीनंतर २०२२ मध्येच अमेरिकेत मंदी येईल असे तज्ज्ञ भाकीत करत होते, परंतु तसे झाले नाही. अडीच वर्षे उलटून गेली, पण आता परिस्थिती आणखी बिकट होऊ लागली आहे. अमेरिकेतील मंदीच्या भीतीमागे ३ मोठी चिन्हे आहेत.

अमेरिकेच्या वेतन आकडेवारीनुसार, फेब्रुवारीमध्ये अमेरिकेतील बेरोजगारीचा दर ४.१% होता. वॉल स्ट्रीट जर्नलच्या मते, नोकऱ्या कमी करणे यामुळे बेरोजगारी विक्रमी नीचांकी पातळीवर आली आहे. वर्षाच्या अखेरीस ५ लाख नोकऱ्या जाऊ शकतात असा अंदाज आहे.मिशिगन विद्यापीठाचा ग्राहक भावना निर्देशांक नोव्हेंबर २०२२ नंतरच्या सर्वात कमी पातळीवर आला आहे. मार्च २०२५ मध्ये हा आकडा ५७ होता. याद्वारे ग्राहक आणि गुंतवणूकदारांच्या खर्चाचा आणि गुंतवणुकीचा अंदाज लावला जातो.

वित्तीय सेवा कंपनी जेपी मॉर्गनच्या



वरिष्ठ अर्थशास्त्रज्ञांनी अमेरिकेत मंदीची शक्यता ४०% पर्यंत वाढवली आहे. २०२५ च्या अखेरीस अमेरिकेत मंदी येण्याचा अंदाज आहे.

अमेरिका ही जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. त्याचे धागे संपूर्ण जगाशी जोडलेले आहेत. जर अमेरिका मंदीत सापडली तर जगाच्या मोठ्या भागावर त्याचा परिणाम होण्याची खात्री आहे. उदाहरणार्थ, मंदीच्या भीतीमुळे, भारतासह आशियाई शेअर बाजारांमध्ये मोठी घसरण झाली आहे.

भारताची अमेरिकेसोबतची आयात-निर्यात चीनपेक्षा खूप जास्त आहे. अमेरिकेसोबत आपली आयात-निर्यात अधिशेष आहे. याचा अर्थ असा की आपण अमेरिकेत जास्त निर्यात करतो. आपण त्यांच्याकडून कमी आयात करतो, म्हणजे आपण जास्त विक्री करतो आणि कमी खरेदी करतो.

हेच कारण आहे की जर अमेरिकेत मंदी आली तर आपल्या निर्यातीवरही परिणाम होईल. आपली मागणी कमी होईल. भारताची अर्थव्यवस्थाही कमकुवत होईल. त्याचा परिणाम आपल्या बचतीवर वाढेल. भारताला त्याच्या बचत क्षेत्रामुळे वाचवले जाते. जेव्हा बचत क्षेत्रात घट होईल तेव्हा भारताची अर्थव्यवस्था अधिकच घसरेल.

अमेरिकेला अनेक वेळा मंदीचा सामना करावा लागला आहे. १९७९ मध्ये झालेल्या इराणी क्रांतीमुळे तेल उत्पादनात घट झाली आणि जगभरात तेलाच्या किमती वाढल्या.महागाई नियंत्रित करण्यासाठी अमेरिकेने कडक आर्थिक धोरण स्वीकारले, ज्यामुळे अमेरिकेत मंदी आली. १९७३ च्या तेल संकटामुळे आणि १९७९ च्या ऊर्जा संकटामुळे अमेरिकेत झालेल्या महागाईमुळे हे बदल करण्यात आले. या काळात अमेरिकेत बेरोजगारीचा दर १०.८% पर्यंत पोहोचला. तसेच, अमेरिकेचा जीडीपी विकास दर उणेपर्यंत पोहोचला आणि -२.७% झाला.

१९९० च्या दशकाच्या सुरुवातीला अमेरिकेला मंदीचा सामना करावा लागला. याचे सर्वात मोठे कारण इराण-इराक युद्ध होते. परिणामी, तेलाच्या किमती वाढल्या. महागाई नियंत्रित करण्यासाठी यूएस फेडरल रिझर्व्ह बोर्डाने फेडरल फंड रेट वाढवला. यामुळे अमेरिकेचा जीडीपी विकास दर -१.४% झाला आणि बेरोजगारीचा दर ७.८% नोंदवला गेला.

३. डॉट-बॉम्ब मंदी (२००१)

टेक कंपन्यांमध्ये मोठ्या गुंतवणुकीनंतर, अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात मोठा आर्थिक विस्तार दिसून आला. यामुळे निर्माण झालेला डॉट-कॉम बबल किंवा इंटरनेट बबल अचानक फुटला. तसेच, व्यवसाय खर्च आणि गुंतवणुकीत मोठी घट झाली. ९/११ च्या हल्ल्यामुळे अमेरिकेच्या वाढीला थोडासा अडथळा आला. या घटनांमुळे देशात आर्थिक गोंधळ निर्माण झाला, ज्यामुळे मंदी आली. या काळात अमेरिकेचा जीडीपी विकास दर -०.३% होता आणि बेरोजगारीचा दर ६.३% नोंदवला गेला.

अमेरिकेत घरांच्या किमती घसरल्याने जागतिक आर्थिक संकट निर्माण झाले. त्याच वेळी, तेल आणि अन्नधान्याच्या




किमती गगनाला भिडल्या होत्या. या संकटात अमेरिकेतील बेअर स्टर्न्स, फ्रेडी मॅक, लेहमन ब्रदर्स, एआयजी सारख्या अनेक मोठ्या वित्तीय संस्था कोसळल्या. ऑटोमोबाईल उद्योगालाही संकटाचा सामना करावा लागला.

अमेरिकेच्या बिघडत्या आर्थिक परिस्थितीमुळे देशाला महामंदीचा सामना करावा लागला. या काळात अमेरिकेचा जीडीपी विकास दर -५.१% नोंदवला गेला आणि बेरोजगारीचा दर १०% पर्यंत पोहोचला.

मार्च २०२० मध्ये, कोविड-१९ साथीचा आजार अमेरिकेत पसरला. यामुळे, प्रवास आणि अनेक कामांवर बंदी असल्याने रोजगारात मोठी घट झाली. या काळात अमेरिकेत २.४ कोटी लोकांनी नोकऱ्या गमावल्या आणि बेरोजगारीचा दर १४.७% पर्यंत पोहोचला. या काळात अमेरिकेचा जीडीपी विकास दर -१९.२% होता. तथापि, ही मंदी रेकॉर्डवरील सर्वात कमी काळाची होती.

जर अमेरिका मंदीत सापडली तर भारतावरही त्याचा परिणाम होऊ शकतो. तथापि, जर आपली अर्थव्यवस्था मागणी कायम ठेवत असेल. जर गरिबांची मागणी अशीच राहिली तर मंदीचा परिणाम कमी होईल.

आरबीआयच्या जीडीपी वाढीच्या आकडेवारीनुसार, स्वातंत्र्यानंतर भारताला चार वेळा मंदीचा सामना करावा लागला आहे. १९५७-५९ या काळात भारताचा जीडीपी विकास दर उणे झाला, जो -१.२% नोंदवला गेला. या वर्षी भारतीय अर्थव्यवस्थेला पहिल्या मंदीचा सामना करावा लागला.

दुष्काळामुळे भारताची दुसरी मंदी आली. १९६५-६६ मध्ये आलेल्या तीव्र दुष्काळामुळे भारताचा जीडीपी विकास दर उणेपर्यंत पोहोचला, जो -३.६६% नोंदवला गेला. तसेच अन्नधान्याचे उत्पादन २०% ने घटले. त्यामुळे देशात अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला. उपासमारीने त्रस्त असलेल्या लोकांना मदत करण्यासाठी परदेशातून धान्य आणि अन्नपदार्थ भारतात पाठवण्यात आले. १९६६ च्या आर्थिक वर्षात भारताला १ कोटी टन अन्न मदत मिळाली.

१९७३ मध्ये जागतिक पातळीवर तेल संकट निर्माण झाले. त्याचा परिणाम भारतावरही झाला. त्या काळात तेलाच्या किमती ४००% वाढल्या होत्या. त्याच वेळी, भारताचा जीडीपी विकास दर उणेपर्यंत पोहोचला. १९७९-८० दरम्यान जगाला दुसऱ्यांदा तेल संकटाचा सामना करावा लागला.

मंदीतून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे गुंतवणूक वाढवणे. जेव्हा खासगी क्षेत्रातील गुंतवणूक कमी होते तेव्हा सरकारने त्यांची गुंतवणूक वाढवावी. यासाठी सरकारला राजकोषीय खोली दर वाढवावा लागेल. अशा परिस्थितीत सरकारची भूमिका महत्त्वाची असते. त्यांनी उचललेली पावलेच देशाला मंदीतून बाहेर काढू शकतात.

■ ■ ■

# कॅश फॉर स्कुल जॉब घोटाळा!

पश्चिम बंगाल मधील शिक्षक भर्ती घोटाळा हा अलिकडच्या काळातील सर्वात मोठा घोटाळा मानावा लागेल.शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भर्ती करताना मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आली आणि पश्चिम बंगाल स्कूल सर्व्हिस कमिशनच्या कार्यपद्धतीवर भले मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले. कलकत्ता उच्च न्यायालयाने २५७५३ शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द केल्यानंतर देशभरात खळबळ माजली.आता सर्वोच्च न्यायालयाने त्यावर शिक्कामोर्तब केल्याने ते सर्व कर्मचारी आता हवालदिल झाले आहेत.

२०१६ साली पश्चिम बंगाल मध्ये सरकारी आणि सरकारकडून अनुदानित शाळांसाठी शिक्षक भर्तीची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती.मात्र त्याकरिता जी परीक्षा घेण्यात आली त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार आढळून आल्याने त्या विरोधात मेरिट मध्ये आलेल्या, परंतु निवड न झालेल्या परीक्षार्थींनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या. परीक्षेत कमी गुण मिळालेल्या बऱ्याच उमेदवारांना लाच स्विकारून आणि वशिलेबाजीने नोकऱ्या प्रदान करण्यात आल्या.आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या उमेदवारांनी उत्तरपत्रिका कोऱ्या सोडल्या होत्या, त्यातील काही जणांना लाच घेऊन नोकऱ्या प्रदान करण्यात आल्या होत्या.एवढेच नव्हे तर काही उमेदवार असे होते की ते परीक्षेला बसलेही नव्हते, त्यांच्यापैकी काही जणांना वशिलेबाजीच्या जोरावर आणि पैशांच्या मोबदल्यात शिक्षकाची नोकरी प्रदान करण्यात आली होती.



अभय गोखले

भर्तीसाठी जी लेखी चाचणी घेण्यात आली,ती ऑप्टिकल मार्क रेकगनिशन ( डटफ ) शिट्सवर घेण्यात आली.मात्र स्कूल सर्व्हिस कमिशनने स्कॅनिंग केल्यानंतर वर्षभराने ओरिजिनल ओएमआर शिट्स नष्ट केल्याने महत्वाचा पुरावा नाहीसा झाला.त्याच्या ज्या डिजिटल कॉपीज होत्या त्या स्कूल सर्व्हिस कमिशनच्या सर्व्हर मधून गायब झाल्याचे, सीबीआयने केलेल्या तपासात उघडकीस आले, त्यामुळे संशय अधिकच गडद झाला.

शिक्षक भर्तीमध्ये ज्या नियुक्त्या करण्यात आल्या, त्यातील जवळपास ८ हजार नियुक्त्या या संशयास्पद असल्याची माहिती समोर आली आहे.आपली शिक्षकपदी नियुक्ती व्हावी म्हणून काही कमी गुण मिळालेल्या उमेदवारांनी पाच ते पंधरा लाख रुपयांची लाच दिल्याचे बोलले जात आहे.

या घोटाळ्या विरोधातील याचिकांवर निर्णय देताना २२ एप्रिल २०२४ रोजी कलकत्ता उच्च न्यायालयाने २५७५३ शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द ठरविल्या. दुर्दैवाने भर्ती प्रक्रियेत जे उमेदवार मेरीटच्या जोरावर शिक्षक म्हणून नियुक्त झाले होते त्यांनाही न्यायालयाच्या निकालानुसार आपली नोकरी गमवावी लागली. उच्च न्यायालयाच्या या निकाला विरोधात पश्चिम बंगाल सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले.

सुरूवातीला सर्वोच्च न्यायालयाने, कलकत्ता उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती दिली, मात्र सीबीआयला चौकशी पुढे चालू ठेवण्यास अनुमती दिली. त्यानंतर त्या बाबत सर्वोच्च न्यायालयात विस्तृत सुनावणी झाल्यावर,३ एप्रिल २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने कलकत्ता उच्च न्यायालयाचा निकाल उचलून धरला.

सर्वोच्च न्यायालयाने असाही आदेश दिला की भर्तीची प्रक्रिया तीन महिन्यांच्या आत नव्याने सुरू करण्यात यावी.महत्वाचे म्हणजे हा शिक्षक भर्ती घोटाळा ज्या काळात झाला त्यावेळी पार्थ चटर्जी हे पश्चिम बंगालचे शिक्षण मंत्री होते.या घोटाळ्या संदर्भात इडीने चटर्जी यांच्या सहकाऱ्याच्या घरावर घातलेल्या छाप्यामध्ये ५१ कोटी रुपये रोख सापडले होते.त्यामुळे देशभर खळबळ माजली होती. एवढी प्रचंड रक्कम मोजण्यासाठी कॅश काउंटिंग मशिन्स आणावी लागली होती. तसेच ती कॅश नेण्यासाठी ट्रक मागवावे लागले होते.त्यानंतर पार्थ चटर्जी यांना जुलै २०२२ मध्ये अटक करण्यात आली होती.

कॅश फॉर स्कूल जॉब प्रकरणी पश्चिम बंगाल प्राथमिक शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष आणि सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचे आमदार माणिक भट्टाचार्य यांना ऑक्टोबर २०२२ मध्ये अटक करण्यात आली. २५७५३ एवढ्या मोठ्या प्रमाणात झालेल्या शिक्षकांच्या नियुक्त्या न्यायालयाने रद्द केल्यामुळे, त्यांचा भविष्य काळ अंधःकारमय झाला आहे.

एवढ्या मोठ्या शिक्षक भर्ती घोटाळ्यामुळे पश्चिम बंगालचे नांव बदनाम झाल्यानंतरही, राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्यापासून धडा घेतलेला दिसत नाही. त्यांची भाषा नेहमीप्रमाणे आक्रमक आहे. त्यांनी न्यायालयाचा निकाल स्विकारण्यास नकार दिला आहे. शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द करण्याऐवजी त्यांच्या बदल्या केल्या असत्या तर ते जास्त सयुक्तिक ठरले असते, अशी हास्यास्पद प्रतिक्रिया ममतांनी नोंदवली आहे.

या घोटाळ्याची जबाबदारी मुख्यमंत्री या नात्याने स्विकारून, खरे तर ममतांनी नोकरी गमावलेल्या शिक्षकांची माफी मागायला हवी होती. परंतु तसे न करता त्यांनी या सर्व प्रकरणाचा ठपका भाजपा आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट या पक्षांवर ठेवला आहे. भाजपा आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट हे पक्ष पश्चिम बंगाल मधील शिक्षण व्यवस्था अस्थिर करु पहात आहेत, असा आरोप ममतांनी वरील दोन पक्षांवर लावला आहे.

त्यांनी सांगितले की नियुक्त्या रद्द करण्यात आलेल्या शिक्षकांपैकी अकरा हजार शिक्षक हे नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना शिकवत होते, तर पाच हजार सहाशे शिक्षक हे अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना शिकवत होते. त्यातील बरेचसे शिक्षक हे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षांचे पेपर तपासत होते. आता एवढ्या मोठ्या प्रमाणात शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द झाल्यानंतर विद्यार्थ्यांना कोण शिकवणार असा प्रश्न ममतांनी विचारला आहे.

पश्चिम बंगाल मधील शिक्षण व्यवस्था न्यायालयाच्या या निर्णयामुळे जवळ जवळ कोसळून पडली आहे. हजारो युवकांचे करियर बरबाद झाले आहे. शिक्षक भर्तीची प्रक्रिया नव्याने सुरू करण्यात येईल तेव्हा ती प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी बराच अवधी लागू शकेल.अशा परिस्थितीत शिक्षकांचा तुटवडा भासेल आणि शाळांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागेल.

■ ■ ■

# ८ एप्रिल दिनविशेष

**महत्वाच्या घटना :**

१८३८: द ग्रेट वेस्टर्न हे वाफेचे इंजिन असलेले जहाज इंग्लंडमधील ब्रिस्टॉल येथून निघून पंधरा दिवसांनी न्यूयॉर्क येथे पोचले. अटलांटिक महासागर पार करणारी ही पहिली आगबोट.

१९११: डच भौतिकशास्त्रज्ञ हाइक ओन्नेस यांनी अतिसंवाहकतेचा शोध लावला.

१९२१: आचार्य विनोबा भावे यांनी पवनार आश्रमाची स्थापना वर्धा येथे केली.

> १९२९: भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी दिल्लीतील सेंट्रल असेंब्लीत बॉम्बस्फोट केला.

१९५०: भारत आणि पाकिस्तान मध्ये लयाकत-नेहरु करार झाला.

१८५७: मंगल पांडे ह्यांना फाशी झाली

**८ एप्रिल जन्म**

१९२४: शिवपुत्र सिद्धरामय्या कोमकलीमठ ऊर्फ कुमार गंधर्व यांचा जन्म. (मृत्यू: १२ जानेवारी १९९२)

> १९२८: नामवंत मराठी साहित्यिक, स्वामीकार रणजित देसाई यांचा जन्म.

१९३८: संयुक्त राष्ट्रांचे ७ वे प्रधान सचिव कोफी अन्नान यांचा जन्म.

१८९२: अमेरिकन चित्रपटसृष्टीतील अग्रणी कलाकार मेरी पिकफोर्ड यांचा जन्म

१३६३: मंगोलियाचा राजा तैमूरलंग यांचा जन्म

**८ एप्रिल मृत्यू**

१८९४: वंदे मातरम् या राष्ट्रगीताचे कवी, बंकिमचंद्र यादवचंद्र चटर्जी यांचे निधन.

१९७३: स्पॅनिश चित्रकार आणि शिल्पकार पाब्लो पिकासो यांचे निधन.

२०१३: मार्गारेट थॅचर यांचे निधन.

# ट्रम्प यांच्या विरुद्ध ' हॅण्डस ऑफ'

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येऊन जेमतेम तीन महिने झाले. या तीन महिन्यातच अमेरिकन जनता त्यांना वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने तीन महिन्यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे.

विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्वच्या सर्व म्हणजे पन्नास राज्यातील बाराशे शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत.

आंदोलकांनी या आंदोलनाला 'हॅण्डस ऑफ' आंदोलन असे नाव दिले असून हे आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे सांगितले जात असून या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला असून त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातले हे आंदोलन शांततेच्या मार्गाने चालू असल्याने कोणालाही अटक करण्यात आली नाही मात्र या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली आहे हे मात्र नक्की.

आंदोलकांनी केवळ डोनाल्ड ट्रम्प यांच्याच विरोधात नव्हे तर त्यांचे सहाय्यक ॲलन मस्क यांच्या विरोधातही घोषणा दिल्या आहेत. तीन महिन्यांपूर्वी ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार.

राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला आहे. हे करताना त्यांनी अमेरिकेचेच भले होणार असे जनतेला ठासून सांगितले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयाला मेक्सिको, चीन, भारत, कॅनडा या देशांनीही जशास तसे उत्तर देऊन अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालांवर तितकाच अतिरिक्त कर लावला आहे त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले आहे याचा परिणाम जितका जगावर होणार आहे तितकाच तो अमेरिकेवर देखील होणार आहे. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती तेथील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

जर अमेरिकेत मंदी आली तर अमेरिकेत महागाई वाढेल त्याचा फटका तेथील सर्वसामान्य नागरिकांनच बसेल त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा हा निर्णय तेथील सर्वसामान्य लोकांना पटलेला नाही. केवळ हा एकमेव निर्णय नाही तर गेल्या काही दिवसात ट्रम्प यांनी घेतलेले अनेक निर्णय जनतेच्या पचनी पडले नाहीत. त्यात हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत.

या निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरली आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. आंदोलनाची धग वाढतच चालली आहे.

एककल्ली, मनमानी कारभार केला तर जनता ती खपवून घेत नाही हेच या आंदोलनातून अमेरिकन जनतेने दाखवून दिले आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.

---------------

श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

■ ■ ■ ■

# उन्हाळ्यात शरीर हायड्रेटेड ठेवण्यासाठी या ज्यूसचे सेवन ठरेल फायदेशीर

उन्हाळ्याला सुरूवात झाली आहे. उन्हाळ्यात तुमच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे महत्त्वाचे असते. उन्हाळ्यात अनेक लोकांना उष्मघाताचा त्रास होतो. उन्हाळा येताच शरीरात पाण्याची कमतरता, थकवा, डिहायड्रेशन आणि आळस यासारख्या समस्या वाढू लागतात. कडक उन्हात आणि दमट हवामानात, उच्च ऊर्जा राखणे आव्हान बनते.

अशा परिस्थितीत, पाणीयुक्त आणि हायड्रेटिंग पदार्थांचे सेवन करणे खूप महत्वाचे आहे, जेणेकरून शरीराला ओलावा मिळेल आणि तुम्ही दिवसभर सक्रिय राहाल. जर तुम्ही उन्हाळ्यात एनर्जी ड्रिंक्स किंवा कोल्ड्रिंक्स पिण्याऐवजी नैसर्गिक आणि आरोग्यदायी पेये शोधत असाल तर तुमच्यासाठी ज्यूस हा सर्वोत्तम पर्याय आहे.



बीट, काकडी आणि भोपळ्याचे रस उन्हाळ्यात शरीराला थंड ठेवण्यास तसेच हायड्रेटेड ठेवण्यास मदत करतात. हे रस शरीराला आतून पोषण देतातच पण तुमची त्वचा चमकदार बनवतात.

**बीटरूटचा ज्यूस :** बीटरूटला सुपर फूड म्हटले जाते कारण त्यात लोह, फॉलिक ॲसिड, नायट्रेट्स आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर असतात. उन्हाळ्यात बीटरूटचा रस पिल्याने शरीर डिटॉक्स होते, रक्तदाब नियंत्रित राहतो आणि उर्जेची पातळी राखली जाते. शरीरात हिमोग्लोबिन वाढवण्यास मदत करते. त्वचा चमकदार आणि मुरुममुक्त ठेवते. रक्तदाब नियंत्रित करते. थकवा आणि अशक्तपणा दूर करते. बीट आणि गाजर सोलून त्यांचे लहान तुकडे करा. या सर्व गोष्टी आल्यासोबत मिक्सर किंवा ज्युसरमध्ये घाला. थोडे पाणी घाला, ते बारीक करा, गाळून घ्या आणि एका ग्लासमध्ये ओता. या ज्यूसमध्ये लिंबाचा रस घाला आणि थंड करून प्या.

**काकडीचा ज्यूस :**

काकडी हा सर्वोत्तम हायड्रेटिंग अन्न आहे. त्यात ९०% पेक्षा जास्त पाणी असते, जे शरीराला थंड करण्यास आणि विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करते. हा रस शरीराला हायड्रेट ठेवतो आणि डिहायड्रेशन टाळतो. त्वचेला विषमुक्त करते आणि तिला नैसर्गिक चमक देते. हे वजन कमी करण्यास देखील मदत करते आणि पचन निरोगी ठेवून बद्धकोष्ठतेपासून आराम देते. काकडी धुवून त्याचे लहान तुकडे करा. त्यात पुदिन्याची पाने आणि पाणी घालून मिक्सरमध्ये बारीक करा. रस गाळून एका ग्लासमध्ये ओता आणि त्यात लिंबाचा रस आणि काळे मीठ घाला. सकाळी किंवा दुपारी ते प्या.

**भोपळ्याचा ज्यूस :** भोपळ्याचा रस हा सर्वात आरोग्यदायी आणि हलका पेय मानला जातो. हे शरीराला आतून थंड ठेवण्यास, पचनसंस्था सुधारण्यास आणि वजन कमी करण्यास मदत करते. पोटाची जळजळपासून आराम मिळण्यासाठी भोपळ्याचा रस खूप फायदेशीर आहे. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## मरणोपरान्त ?

मरावे परी कीर्ती रुपे उरावे
सांगताहेत संत महात्मे ..!
आत्मा अमर, काया
असे नश्वर म्हणून
मृत्यूनंतर शरीराचे दहन..

शरीराची बनते राख
त्यापेक्षा केले अवयव दान
गरजवंताला मिळेल जीवन
करायला हवे या देहदान. !

तन - मन - धनाने
जो करे परोपकार
त्यासाठी नेहमीच -
उघडे असे स्वर्गद्वार
हेच आहे गीता सार ..!

# युवा मानस

## जिथे आकाश ठेंगणे...

अचिव्हर



हिंदी साहित्यातील महान कवी, कथाकार आणि गझलकार दुष्यंत कुमार यांची एक ओळ खूप प्रसिद्ध आहे. 'कोण म्हणतं आकाशात छिद्र असू शकत नाही. मित्रांनो, मनापासून दगड तर मारून बघा...' या अर्थाच्या ओळी जगात कोणतेही काम अशक्य नाही, हेच सांगून जातात. फक्त हाती घेतलेले काम पूर्ण उत्साहाने आणि दृढ हेतूने केले पाहिजे. आपल्या कामाद्वारे 'क्लिअर कार रेंटल सर्व्हिस'चे मालक सचिन काटे यांनी ही म्हण खरी ठरविली आहे.

संघर्ष प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात येतो; पण हिंमत असणारे त्यावर मात करू शकतात. सचिन यांच्याकडे पाहिल्यावर या विधानातील सत्यता पटते. सचिन अशा ठिकाणाहून आले आहे, जिथे लोकांना स्टार्टअप या शब्दाशी काही देणेघेणे नव्हते. असे असूनही त्यांनी स्वतःचा स्टार्टअप सुरू केला नाही तर सुमारे २०० कोटी रुपयांची कंपनी बनवून एक आदर्श निर्माण केला. सचिन यांच्या यशाच्या वाटचालीत अनेक अडथळे आले. पण त्यामुळे निराश होण्याऐवजी त्यांचा उपयोग प्रगतीच्या पायऱ्या म्हणून केला. समाजाच्या रूढीवादी विचारांच्या पलीकडे जाऊन त्यांनी आदर्श घालून दिला आहे, ज्यातून प्रत्येक तरुण काहीतरी करायला शिकतो.

**तरुण वय, मोठी स्वप्ने**

सचिन काटे यांचा जन्म महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एका छोट्याशा गावात गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे कुटुंब केवळ आर्थिक संकटातून जात नव्हते तर त्यांच्यापुढील सामाजिक आणि शैक्षणिक आव्हानेही मोठी होती. गावातच चौथीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर वडिलांनी त्यांना पुढील शिक्षणासाठी मित्राच्या घरी पाठवले. मात्र शहरात टिकून राहण्याचे मोठे आव्हान होते. त्यासाठी त्यांनी वर्तमानपत्रे विकण्यास सुरुवात केली. ते सकाळी घरोघरी जाऊन वृत्तपत्रे वाटायचे, त्यानंतर शाळेत जाऊन अभ्यास करायचे. मात्र लहान वयातही त्यांची स्वप्ने मोठी होती. ती पूर्ण करण्यासाठी कितीही कष्ट करण्याची तयारी होती.

**अर्धवेळ पगार, पूर्णवेळ नोकरी**

आव्हानांशी झुंज देत त्यांनी दहावी उत्तीर्ण केली आणि कसातरी अकरावीला प्रवेश मिळवला. पण शिक्षणाचा स्तर वाढू लागला तसतसा खर्चही वाढू लागला. दरम्यान, त्यांना एका कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटमध्ये ऑफिस बॉय म्हणून नोकरी मिळाली. त्यामुळे पैशांची समस्या काही प्रमाणात कमी झाली. येथे काम करत असताना सचिन यांनी संगणकाशी संबंधित बारकावे शिकण्याची एकही संधी सोडली नाही. त्याचा परिणाम असा झाला, की बारावी पूर्ण झाल्यावर त्यांनी वेब डेव्हलपमेंट कंपनीत अर्धवेळ नोकरी स्वीकारली. तिथे अर्धवेळ पगार मिळत होता. पण ते पूर्णवेळ काम करायचे कारण तिथे खूप काही शिकायला मिळत होते. त्याचबरोबर प्रवास आणि आदरातिथ्य या क्षेत्रातही त्यांनी प्रावीण्य मिळवले. बारावी झाल्यावर एका ट्रॅव्हल एजन्सीत ट्रॅव्हल एजंटची नोकरी लागली.

**चार लोकांपासून सुरुवात केली**

ट्रॅव्हल एजन्सीमध्ये काम करत असताना ते व्यवसाय करण्याच्या पद्धती आणि धोरणांशी परिचित झाले. याच काळात स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा विचार त्यांच्या मनात आला. २०११ मध्ये त्यांनी याची अंमलबजावणी केली आणि चार सदस्यांच्या टीमसह 'क्लिअर कार रेंटल प्रायव्हेट लिमिटेड'ची स्थापना झाली. कंपनी वेगाने वाढू लागली. चार सदस्यांच्या टीमनिशी सुरू झालेली 'क्लिअर कार रेंटल' सेवा आज भारतातील २४० हून अधिक शहरांमध्ये सुमारे १४,००० कॅबसह कार्यरत आहे. सचिन काटे यांच्या मेहनतीचा अंदाज यावरून लावता येतो की, ते ना सुटी घेतात ना त्यांच्या कामाच्या तासांची नोंद आहे.

आज त्यांच्या कंपनीची उलाढाल सुमारे दोनशे कोटी रुपये आहे. ती भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या स्टार्टअपपैकी एक आहे. कार भाड्याने देण्याच्या उद्योगात क्रांती घडवून आणेल अशा प्रकारे उत्पादने, सेवा आणि तंत्रज्ञान विकसित आणि लॉन्च करण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. ते लवकरच साध्य होवो ही शुभकामना.

## फंडू एसएमएस

मैं भी हुआ करता था वकिल
इश्क वालों का कभी...
नजरे उस से क्या मिलीं,
आज खुद कटघरे में हूं।

आरजू होनी चाहिए
किसी को
याद करने की, लम्हें तो,
अपने आप ही मिल जाते हैं।

मेरी जिंदगी में खुशियां तेरे
बहाने से है,
आधी तुझे सताने से है
आधी तुझे मनाने से है।

## नीता अंबानीसारखी ज्वेलरी, तीही शंभर रुपयांत !

गिफ्टिंग

जगातील सर्वात मोठ्या उद्योगपतीची पत्नी असणाऱ्या नीता अंबानी यांनी स्वतःची एक खास ओळख निर्माण केली आहे. नीता अंबानी आपल्या पेहरावातून, आभुषणांमधून भारतीय संस्कृतीचे सादरीकरण करतात. त्या वेगवेगळ्या प्रकारचे डिझायनर दागिने घालताना दिसतात. भारतात सणांचा हंगाम नेहमीच असतो. एकामागून एक सण साजरे होत असतात. तेव्हा तुम्हीही घरातील महिलावर्गाला वा मैत्रिणींना अशी आभुषणे भेट म्हणून देऊ शकता. यावेळी तुम्ही नीता अंबानी यांची शैलीही कॉपी करू शकता. नीता अंबानी ज्वेलरी घालतात त्याच डिझाइनचे दागिने तुम्ही अवघ्या १००-२०० रुपयांमध्ये खरेदी करू शकता. भेट म्हणून मिळालेले असे दागिने नक्कीच आकर्षणाचे केंद्र बनतील.

नीता अंबानी यांनी मुलाच्या लग्नात पाचूचा एक आकर्षक हार घातला होता. त्याला जोडलेले पान इतके मोठे होते, की परदेशी फॅशन ब्लॉगर्सही थक्क झाले होते. आता त्याची स्वस्त आवृत्ती बाजारात विकली जात आहे. एक सामान्य व्यक्तीही ती सहजपणे खरेदी करू शकतो. नीता अंबानी यांचा अशा प्रकारचा दागिना परिधान केलेला फोटो 'सोशल मीडिया'वर आला तेव्हापासूनच लोकांमध्ये या नेकपीसची क्रेझ वाढली. नीता अंबानींचा हा दागिना हिरा आणि पाचूने बनलेला आहे. त्याची स्वस्त आवृत्तीही तितकीच देखणी आणि लक्षवेधी आहे. त्यामुळेच ती ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहे.



**लोकांची वाढली क्रेझ**

विक्रेत्यांच्या म्हणण्यानुसार, करोडो रुपयांचा हार घालणे प्रत्येकाच्या आवाक्यात नाही. त्यामुळेच आम्ही नीता अंबानींच्या नेकलेसची प्रतिकृती तयार केली आहे आणि खोटे हिरे लावून तयार केलेला हार अवघ्या १७८ रुपयांत उपलब्ध आहे. लोकांना हे दागिने खूप आवडतात. यापूर्वी करीना कपूरच्या नेकलेसच्या डिझाइनच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या होत्या. लोकांमध्ये त्याचीही क्रेझ बघायला मिळाली होती. तेव्हा तुम्हीही असे स्वस्त आणि मस्त गिफ्ट निवडा आणि लाडक्या व्यक्तीला खुश करा.



## करीअर निवडताना...

करीअर ग्रोथ

आपण स्वतःला पारंपरिक साच्यात बसवून घेतो. लोकांचे सल्ले ऐकून नेहमीची वाट निवडतो. मग आपलं रूटीन सुरू होतं. काम होत असतं. पैसेही मिळत असतात. पण यातून समाधान काही लाभत नाही. कामाच्या रेट्यात आपल्या आवडीनिवडी बाजूला ठेवाव्या लागतात. डॉक्टर, इंजिनिअर, सीए होण्याचे दिवस आता मागे पडले आहेत. आज तुम्ही तुमच्या आवडत्या क्षेत्रात करीअर करू शकता. संधींची अजिबात कमतरता नाही. आपली जीवनशैली, आवडीनिवडी यांचा विचार करून करीअरची वाट निवडा. यासाठी नेमकं काय करायला हवं हे जाणून घेऊ या.

* तुम्हाला एकाच ऑफिसमध्ये बसून काम करायला आवडेल का फिरतीची नोकरी पसंत पडेल याचा विचार करा. सतत नव्या गोष्टी शिकण्याची आवड असेल तर फिरतीच्या नोकरीला प्राधान्य द्या. फिरायला आवडत असेल तर पर्यटनासंबंधीच्या करीअरचा विचार करा.
* तुम्हाला महागड्या वस्तू खरेदी कराव्याशा वाटतात का फक्त त्यांचा अनुभव घेऊन तुम्ही सुखावता. ब्रांडेड, महाग वस्तू खरेदी करायला आवडत असेल तर चांगल्या पदावर जाण्याचा प्रयत्न करा. भरपूर पगार असेल तरच तुम्ही अशा वस्तूंच्या खरेदीचा विचार करू शकता.
* सतत कामात राहणं आवडत असेल तर त्या पद्धतीची नोकरी शोधा किंवा कार्यक्षेत्राची निवड करा. स्वतःसाठी वेळ हवा असेल तर तुम्ही व्यवसायाकडे वळू शकता.
* तुम्हाला समाधानापेक्षा महत्त्वाकांक्षा जास्त महत्त्वाची वाटत असेल तर जबाबदारीचं काम घ्या. डेडलाईन्सवर काम करा. कामाचं कौतुक होईल असं बघा. पण तुम्हाला तणावमुक्त, शांत आणि आनंदी आयुष्य जगायचं असेल तर त्याप्रमाणे पर्यायांची निवड करा.

## टेक अपडेट्स

### सौर ऊर्जेवर चालणार लॅपटॉप

'लेनोवो' ने सौरऊर्जेवर चालणारा लॅपटॉप बाजारात आणला असून त्याची बॉडी खूप स्लीक आणि स्लिम आहे. त्यामुळे तुम्ही तो कधीही, कुठेही घेऊन जाऊ शकता. लॅपटॉपच्या डिस्प्लेच्या मागे एक सोलर पॅनेल ग्रिड आहे. त्यामुळे लॅपटॉपच्या बिल्ट-इन बॅटरीला पॉवर मिळवण्यासाठी आणि चार्ज करण्यासाठी थेट सूर्यप्रकाश आणि इनडोर लाइटिंग या दोन्हीमधून मिळणारी ऊर्जा वापरता येणार आहे. 'लेनोवो' कंपनीचे म्हणणे आहे, की हा लॅपटॉप नऊ तासांच्या सौरऊर्जेत ०-८६ टक्क्यांपर्यंत चार्ज होऊ शकतो. हा लॅपटॉप २० मिनिटे उन्हात ठेवला तर बराच वेळ सहजतेने काम करू शकता. 'लेनोवो' ने याबरोबरच सौरऊर्जेवर चालणारा कीबोर्ड आणि माउसदेखील लॉंच केला आहे. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये तुम्ही घरातील वीज वापरुन हा लॅपटॉप चार्ज करू शकाल.




## उपाय

### अमेरिकेत वाटले जातात मोफत एअर टॅग

वस्तू विसरण्याची सवय असली किंवा प्रवासात बॅगेवर लक्ष ठेवण्याची गरज असेल तर एअर टॅग अनेक कामे सुलभ करतो. याद्वारे आता वस्तूंचा मागोवा घेतला जाऊ शकतो. याच्या मदतीने तुम्हाला कुठली वस्तू कुठे ठेवली आहे किंवा ती कुठे पोहोचली आहे हे घरातूनच कळू शकते. झाले असे की, कार चोरीच्या घटनांमुळे अमेरिकेतील डेन्व्हर शहरात राहणारे लोक काळजीत होते. तेव्हा अशा घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक पोलीस लोकांना आता या 'एअरटॅग' आणि 'सॅमसंग स्मार्टटॅग'चे वाटप करत आहेत. हे टॅग कार चोरीच्या घटना थांबवू शकत नाहीत; परंतु त्याद्वारे गाड्यांवर लक्ष ठेवणे सोपे होईल, असा पोलिसांचा दावा आहे. यासाठी डेन्व्हर पोलिसांनी 'कोलोरॅडो ऑटो थेफ्ट प्रिव्हेन्शन अथॉरिटी'शी भागीदारी केली आहे. या भागीदारीअंतर्गत लोकांना एअर टॅग आणि स्मार्ट टॅग वितरित करण्यात आले आहेत.



## टेक टॉक

### वाय-फाय राऊटर सुरू ठेवणे फायदेशीर

वाय-फाय राउटर २४/७ सुरू ठेवण हा सर्वोत्तम पर्याय आहे. कारण काही राउटर त्यांच्यासाठी कनेक्टिव्हिटी अनुभव सुनिश्चित करतात आणि डिव्हाइसला योग्यरित्या कार्य करण्यास मदत करतात. काहीजण रात्री वायफाय बंद करतात. त्यामुळे वीजबिलाची बचत होते, असे त्यांना वाटते. पण हे खरे नाही. रात्रीच्या वेळी वाय-फाय राउटर बंद करून ठेवला तरी ही बचत इतकी कमी आहे की त्याचा वीज बिलात फारसा फरक दिसणार नाही. लोक सहसा राउटर बंद करत नाहीत कारण ते २४/७ चालण्यासाठीच डिझाइन केलेले असतात. उलटपक्षी वारंवार चालू-बंद केल्याने त्याचे आयुष्य कमी होऊ शकते.





## मध्यप्रदेशातील अपशकुनी महाल

नवल

भारतीय इतिहासात डोकावले तर असे अनेक संदर्भ आढळतात जे कायमच भारावून टाकतात. राजेमहाराजांची संस्थाने, त्यांची श्रीमंती, तेथील रुढी आणि परंपरा पाहताना डोळे दिपतात. राजेशाही थाट पाहताना कायमच या राजेरजवाड्यांच्या प्रासादाची अर्थात त्यांच्या आलिशान महालांचीसुद्धा तितकीच चर्चा होते. मात्र अशाच एका महालाला अपशकुनी किंवा दुर्दैवी महाल म्हटले जाते.

मध्य प्रदेशातील दतिया इथे हा महाल असून त्याचं नाव 'सतखंडा महाल' असं आहे. मात्र पाहताक्षणी डोळ्यांचं पारणं फेडणाऱ्या या महालाकडे ४०० वर्षांपासून क्वचितच कोणी फिरकलं आहे. इथं आजवर कोणीही वास्तव्य केलेले नाही. हा अपशकुनी महाल असल्याचं अनेकजण म्हणतात. महाराज बीर सिंह देव यांनी या महालाची उभारणी केली; पण त्यांच्या कुटुंबानं कधीच या महालाचा वापर केला नाही.

**पाण्याखाली मजले**

सतखंडा महालाच्या निर्मितीसाठी कोणत्याही लाकूड अथवा लोखंडाचा वापर झालेला नाही. इतकंच नव्हे तर या महालाच्या सातपैकी दोन मजले पाण्याखाली आहेत. १६२० मध्ये दतियाचे राजा बीर सिंह यांनी ३५ लाख रुपये खर्चून हा महाल बांधला होता. अतिशय बारीक नक्षीकामामुळं त्याच्या पूर्णत्वासाठी तब्बल नऊ वर्षांचा काळ लागला. महालाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथं मंदिर आणि मशीद दोन्हीही आहे.

**४४० खोल्या, शेकडो खिडक्या**

४४० खोल्या, शेकडो खिडक्या आणि झरोके असणारा हा महाल आहे. मुगल शासक जहांगीरच्या स्वागतासाठी त्याची उभारणी करण्यात आली होती. असं म्हणतात की, राजा बीर सिंह देव यांनी शहाजहाना सिंहासनारूढ होण्यासाठी प्रचंड मदत केली होती. त्यामुळे या राजाच्या वाट्याला सिंहासन आलं. जहांगीर इथं आला तेव्हा त्यानं फक्त एका रात्रीचा मुक्काम या महालात केला होता. मात्र तेव्हापासून हा महाल निर्मनुष्य आहे. या महालाची प्रत्येक कमान, प्रत्येक चौक आणि महालातील प्रत्येक नक्षी इतिहासाची साक्ष देणारी असून अद्वितीय कलेचा तो नमुना आहे. पण कोणाचाही वावर नसल्यामुळं काळानुरुप या महालाकडे पाहण्याचा अनेकांचा दृष्टीकोन बदलला आहे. आता त्याला अपशकुनी महाल म्हणूनच ओळखले जाते.

## आरामदायी टी शर्ट

फॅशन पॅशन



झटपट आवरायचं असो किंवा काय घालायचं या प्रश्नाचं उत्तर शोधायचं असो, कॉलरवाल्या टी शर्टला पर्याय नाही. कोणत्याही ऑकेजनला, कुठल्याही बॉटमवर हे कॉलरवाले ट्रेंडी टी शर्ट चालून जातात. ते स्टायलिश तर आहेतच शिवाय उन्हाळ्यात आरामदायी ठरतात. तेव्हा नव्या खरेदीच्या विचारात असाल तर कॉलरवाल्या ट्रेंडी टी शर्टना प्राधान्य द्या.

* प्रिंटेड टी शर्ट मन मोहवून टाकतात. त्यातच तो ब्लॅक टी शर्ट असेल तर त्यावरच्या प्रिंट्स अजूनच खुलून दिसतात. त्यातच काळा रंग कशावरही शोभून दिसतो. काळ्या रंगात तुम्ही कॅमोफ्लेज प्रिंट्सची निवड करू शकता.
* पांढरा हा आपल्या आवडीचा रंग. कॉलरवाला व्हाईट टी शर्ट तुमच्याकडे असेल तर उन्हाळ्यात काळजीचं काहीच कारण नाही. पांढ्या रंगाचे प्रिंटेड किंवा प्लेन कॉलरवाले टी शर्ट तुम्ही घालू शकता.
* गडद रंगाच्या पोलो टी शर्टमुळे तुम्ही उठून दिसाल. केशरी, पिवळा, लाल, जांभळा या रंगाचे प्लेन टी शर्ट घ्या. ट्राउझर, जीन्सवर ते सहज कॅरी करता येतील.
* यंदा थोड्या हटके रंगांना प्राधान्य देता येईल कारण आता मुलांची फॅशनही आता रंगीबेरंगी झाली आहे. ब्राउन, बेच, बरगंडी असे रंगही ट्राय करता येतील.
* काळ्या-पांढऱ्या कपड्यांचा कंटाळा आला असेल तर लाल, मरून शेड्स ट्राय करा.





## पर्यटनासाठी निवडा ही ठिकाणे

भटकंती

आजकाल जीवनशैली अत्यंत धावपळीची झाली आहे. त्यामुळे फिरायला जाण्यासाठी वेळ काढता येत नाही. कधी परीक्षेमुळे तर कधी ऑफिसमधून सुट्ट्या नसल्यामुळे प्रवासाचा बेत नेहमीच अपूर्ण राहतो. पण तुम्हीही या लोकांपैकी एक असाल तर या महिन्यात बाहेर फिरायला जाण्याचा प्लॅन बनवू शकता.

एप्रिलमध्ये हवामान चांगले असते. त्यातच एप्रिल महिन्यामध्ये तीन दिवसांच्या सुट्ट्या एकत्र आहेत. १८ तारखेला गुड फ्रायडे, १९ तारखेला शनिवार आणि २० तारखेला रविवार आहे. अशा परिस्थितीत तुम्हाला शनिवार आणि रविवारी सुट्टी असेल तर एक दिवस सुट्टी घेऊन चार दिवसांसाठी सहलीला जाण्याचा प्लॅन करू शकता.

**नैनिताल**

नैनिताल हे उत्तराखंडमधील सर्वात लोकप्रिय ठिकाणांपैकी एक आहे. तुम्ही येथे अनेक ठिकाणे एक्सप्लोर करू शकता. नैनिताल तलावाला भेट देऊ शकता. याशिवाय तुम्ही टिफिन टॉप, पँगोट आणि किलबरी पक्षी अभयारण्य, नैना पीक, इको केव्ह गार्डन, जीबी पंत हाय अल्टिट्यूड प्राणीसंग्रहालय, स्नो व्ह्यू पॉइंट आणि सरिता ताल यासारखी अनेक सुंदर ठिकाणं एक्सप्लोर करू शकता. नैना देवी मंदिर नैनी तलावाच्या काठावर आहे. येथे दर्शनासाठी जाऊ शकता.

**जयपूर**

तुम्ही जयपूरला तीन दिवसांच्या सहलीसाठी भेट देऊ शकता. येथे भेट देण्यासाठी अनेक सुंदर आणि ऐतिहासिक ठिकाणे आहेत. इथे आमेर किल्ला, सिटी पॅलेस, हवा महल, नाहरगड किल्ला, जयगड किल्ला, जल महल आणि जंतरमंतर अशा अनेक प्रसिद्ध ठिकाणांना भेट देऊ शकता. याशिवाय जवळच्या बाजारपेठेत खास वस्तू खरेदी करू शकता. जोहरी बाजार आणि बापू बाजार हे येथील प्रसिद्ध बाजारपेठांपैकी एक आहेत.

**कसोल**

हिमाचल प्रदेशातील कसोल हे ठिकाण तीन दिवसांमध्ये भेट देण्यासाठी उत्तम ठरेल. तुम्ही येथे मणिकरण साहिब गुरुद्वारा आणि मणिकरण शिव मंदिराला भेट देऊ शकता. याशिवाय, तुम्ही येथून दोन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या खीरगंगेला जाऊ शकता. हिरव्यागार टेकड्या आणि त्यावर असलेले निळे आकाश हे दृश्य पाहून खूप मनमोहक वाटेल. तुम्ही येथील निसर्गाच्या सानिध्यात हरवून जाल. तसेच तुम्ही मलाना गावाला भेट देऊ शकता. हे ठिकाण देव टिब्बा आणि चंद्रखानी टेकड्यांनी वेढलेले आहे.



## उन्हाळ्यात गुलाबपाणी वापरताय, सावधान!

स्किन केअर

गुलाबपाणी हे एक नैसर्गिक टोनर आहे. ते त्वचेसाठी खूप फायदेशीर मानले जाते. हे नैसर्गिक घटकांनी समृद्ध असल्यामुळे वापरल्यानंतर त्वचेला ताजेपणा आणि ओलावा मिळतो. गुलाबपाण्याचा वापर त्वचा ताजेतवानी करण्यासाठी, दाहक-विरोधी गुणधर्मांमुळे त्वचेची जळजळ कमी करण्यासाठी आणि मुरुम आणि मुरुमांवर उपचार करण्यासाठीदेखील केला जातो. पण उन्हाळ्यात सतत गुलाबपाणी लावणे चेहऱ्यासाठी घातक ठरु शकते, हेदेखील लक्षात घ्यायला हवे.

जास्त प्रमाणात गुलाबपाणी वापरले तर त्वचेला हानी पोहोचू शकते. गुलाबपाण्याचे सौम्य तुरट गुणधर्म असतात. त्यामुळे वारंवार वापरल्यास त्वचेतील नैसर्गिक तेल कमी होऊ शकते. त्यातील गुणधर्म त्वचेवरील अतिरिक्त घाण आणि तेल काढून टाकण्यास मदत करतात हे खरे, परंतु गुलाबपाण्याचा जास्त वापर केला तर ते त्वचा खूप कोरडी करू शकते. अर्थातच कोरड्या त्वचेमुळे खाज सुटणे आणि जळजळ असा त्रास होऊ शकतो.

*** ॲलर्जीचा वाढता धोका**

गुलाबपाणी नैसर्गिक मानले जात असले तरी कधीकधी त्याचा जास्त वापर केल्याने ॲलर्जी होऊ शकते. ॲलर्जीच्या लक्षणांमध्ये त्वचेचा लालसरपणा, पुरळ, खाज सुटणे आणि जळजळ होणे यांचा समावेश असू शकतो. म्हणूनच पहिल्यांदाच गुलाबजल वापरत असाल तर त्वचेच्या छोट्या भागावर चाचणी करून पाहा आणि ॲलर्जी न आल्यासच पुढे वापर करा.

*** त्वचेची पीएच पातळी ढासळणे**

गुलाबपाणी जास्त प्रमाणात वापरत असाल तर ते त्वचेची पीएच पातळी खराब करू शकते. यामुळेही त्वचेची जळजळ, खाज सुटणे किंवा पुरळ येऊ शकतात. म्हणूनच गुलाबजल वापरताना संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी अधिक काळजी घ्यावी.

# जिल्हा गुंतवणूक परिषदेत १ हजार २३८ कोटींचे सामंजस्य करार

## जिल्ह्याचा भविष्यातील विकासाचा आशादायी आलेख : जिल्हाधिकारी अजित कुंभार

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला दि. ७ :

जिल्हा गुंतवणूक परिषदेत आज विविध ९५ उद्योग-व्यवसायांशी सामंजस्य करार करून जिल्ह्यात १ हजार २३८ कोटी रू. गुंतवणूकीसाठी महत्वपूर्ण पाऊल उचलण्यात आहे. गुंतवणूकीसाठी जिल्ह्यात पोषक वातावरण तयार झाले आहे. याद्वारे जिल्ह्याचा भविष्यातील विकासाचा आशादायक आलेख निर्माण होत असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे केले.





जिल्हा उद्योग केंद्रातर्फे मूर्तिजापूर रस्त्यावरील हॉटेल आर. जी. एक्सक्लुसिव्ह येथे आयोजित जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाली, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा पोलीस अधिक्षक बच्चन सिंह, उद्योग सहसंचालक नीलेश निकम, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड, नगररचना सहायक संचालक सादिक अली, अकोला जिल्हा औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल आदी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारीकुंभार म्हणाले की, राज्याच्या, तसेच देशाच्या अर्थव्यवस्थेत २०२८ पर्यंत दुपटीने वाढ करण्याचे उद्दिष्ट असून, त्यादृष्टीने शासनाकडून पावले उचलण्यात येत आहेत. सद्यःस्थितीत जिल्ह्याचा जीडीपी ३६ हजार कोटींचा आहे.

तो वाढविण्यासाठी भक्कम सुविधांची आवश्यकता आहे. रेल्वे संपर्क, वैद्यकीय सुविधा ही जिल्ह्याची बलस्थाने आहेत. विमानतळ विकासासाठी आवश्यक भूसंपादन आदी प्रयत्न होत आहेत. एमआयडीसी विस्तारित जागेसाठी बोरगाव मंजू भागात पाहणी करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या सातकलमी कार्यक्रमानुसार गुंतवणूक प्रसार, इज ऑन लिव्हिंग या मुद्द्याचा प्राधान्याने समावेश करण्यात आला. त्यासाठी सुलभ व जलद परवानगी प्रक्रिया, तसेच मैत्री २.० एकल खिडकीतून विविध सुविधा देण्यात येत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

उद्योजकांना समाजकंटकांकडून काही त्रास झाल्यास पोलिस ठाण्यात तक्रार करावी. सायबर गुन्हे घडू नयेत यासाठीही खबरदारी घेणे गरजेचे आहे, असे पोलीस अधिक्षक सिंह यांनी सांगितले. परिषदेत ९५ उद्योग घटकांसोबत सामंजस्य करार झाला. त्यामुळे सुमारे दोन हजारहून अधिक लोकांना रोजगार मिळणार आहे. रिलायन्स सीएनजी प्लांटमधून १२० कोटींची गुंतवणूक होणार आहे. जिल्हास्तरावर गुंतवणूक आकर्षित करणे, जिल्ह्यातील गुंतवणूकदार व व्यावसायिकांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करून देणे, तसेच जिल्ह्यांना विकासाचा केंद्रबिंदू मानून राज्याच्या विकासाला चालना देणे या हेतूने परिषदेचे आयोजन करण्यात आले, असे बनसोड यांनी सांगितले.

परिषदेत जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील गुंतवणूकदार व राज्य शासन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आले. गुंतवणुकीला प्रोत्साहन, औद्योगिक सुविधा, व्यवसाय सुलभीकरण, तसेच उद्योगासाठी आवश्यक परवानगी आणि सेवा काल मर्यादित देण्याच्या दृष्टीने कायदे आदीविषयीचे मार्गदर्शन तज्ज्ञांकडून करण्यात आले.

## महाराष्ट्रावर सूर्याचा प्रकोप

### अकोल्यात सर्वाधिक ४३.२ तापमानाची नोंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

महाराष्ट्रात सूर्य आग ओकू लागला असून तापमानाचा पारा चांगलाच वाढला आहे. गेल्या आठवड्यात दोन दिवस आलेल्या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र आता तापमानाचा पारा चढाच राहणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. अकोल्यात गेल्या दोन दिवसांपासून 43 अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले होते, मात्र आज हेच 43.2 वर गेल्याचे पाहायला मिळाले.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारपासून राज्यातील अनेक भागांमध्ये तापमानात वाढ होणार असून अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर महाराष्ट्रासह विदर्भातही उष्णतेच्या तीव्र लाटा सुरू राहणार असल्याचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे. नागपूर महापालिकेने देखील उष्णतेची तीव्रता लक्षात घेता अलर्ट जारी केला आहे. उष्माघातापासून वाचण्यासाठी नागपूर महापालिकेने हीट ॲक्शन प्लॅन तयार केला आसून शाळांच्या वेळा बदलण्यात आल्या आहेत. तसेच बेघरांना शेल्टर हाऊस आणि इतर हॉटस्पॉट भागांवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार सध्या बंगालच्या उपसागरात चक्राकार वाऱ्यांची स्थिती सक्रिय आहे. दक्षिण आणि उत्तर भारतात अवकाळी पावसाचा धोका असताना, महाराष्ट्रात मात्र उष्णतेची तीव्रता वाढणार असल्याचे स्पष्ट संकेत हवामान विभागाने दिले आहेत. महाराष्ट्रातील अनेक भागांत तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे.

# बस खाली चिरडून मुलीचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ७ :

बोरिवली येथे सोमवारी दुपारी बेस्ट बस खाली तीन वर्षांची चिमुरडी चिरडली. या अपघातात गंभीर जखमी मुलीला कांदिवली येथील शताब्दी रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी मुलीला मृत घोषित केले. याप्रकरणी पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. बोरिवली रेल्वे स्थानक पूर्व येथून मागाठाणे आगाराच्या दिशेने जाणारी बस क्रमांक ए-३०१ दुपारी १ च्या सुमारास राजेंद्र नगर परिसरात पोहोचली. त्यावेळी तीन वर्षांच्या मेहक खातून शेखचा अपघात झाला. या बसखाली मेहक चिरडली. ही बस डागा ग्रुपद्वारे चालविण्यात येत होती, अशी माहिती बेस्टकडून देण्यात आली.

बसचालक प्रकाश दिगंबर कांबळे (४८) हा अपघातग्रस्त बस चालवत होता. या बसमध्ये वाहक नव्हता. बेस्टकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, मुलगी अचानक रस्त्यावर आली. त्यावेळी चालकाने बस थांबवण्याचा प्रयत्न केला. पण ती बसच्या चालाखाली आली. त्यात तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. स्थानिक रहिवाशांनी तातडीने तिला कांदिवली येथील शताब्दी रुग्णालयात नेले. पण तेथील डॉक्टरांनी तिची तपासणी करून तिचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

मुलीच्या मृत्युनंतर पोलिसांनी तातडीने याप्रकरणी अपमृत्यूची नोंद करून करून चौकशी सुरू केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मुलगी बसच्या समोरील डाव्या बाजूच्या चाकाखाली आली. त्यामुळे तिला डोक्याला गंभीर स्वरूपाची जखम झाली. घटनास्थळीच तिचा मृत्यू झाला होता. या अपघाताची पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. याप्रकरणी सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणाची तपासणी करण्यात येत आहे. तसेच प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवले जात

गेल्या काही दिवसांपासून बेस्ट उपक्रमामधील कंत्राटी बसचे अपघात वाढले आहेत. गेल्यावर्षी ९ डिसेंबर रोजी कुर्ला बेस्ट बस अपघातात ९ नागरिकांचा मृत्यू झाला होता. कुर्ला पश्चिम येथील महापालिकेच्या एल विभाग कार्यालयासमोर रात्री १० च्या सुमारास भीषण अपघात झाला होता. भरधाव वेगात धावणाऱ्या बेस्टच्या बसने अनेक पादचारी व वाहनांना धडक दिली. या अपघातामध्ये ४९ जण जखमी झाले होते. त्यापैकी सात जणांचा मृत्यू झाला होता. जखमींपैकी दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. गेल्यावर्षी बेस्टबसचे सुमारे १२ गंभीर अपघात झाले असून त्यापैकी बहुसंख्य अपघात कंत्राटी बस चालकांकडून झाले आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांनीही खासगीकरणाला विरोध केला होता.

# भाविकांनी भरलेल्या बसचा भररस्त्यात कोळसा

■ वृत्तसंस्था, हिंगोली, दि. ७ :

हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ ते वसमत मार्गावरील वगरवाडी शिवारात सोमवारी दुपारी 4 च्या सुमारास भाविकांना घेऊन जाणारी एक प्रवासी बस भररस्त्यात पेटली. या बसमधून तब्बल 40 भाविक प्रवास करत होते.

पण सुदैवाने त्यातील कुणीही जखमी झाले नाही. ते सर्वजण सुखरुप आहेत. पण त्यांच्या सामानाचे मोठे नुकसान झाले आहे. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी तातडीने महसूल विभागाचे पथक घटनास्थळी रवाना केले आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, कर्नाटक राज्यातून एक बस सुमारे 40 भाविकांना घेऊन औंढा नागनाथच्या दिशेने येत होती. सदर बसमध्ये भाविकांसह त्यांच्यासाठी भोजन तयार करण्याचे साहित्यही होते. दुपारी 4 वाजण्याच्या सुमारास सदर बस वसमतकडून औंढा नागनाथकडे येत होती.

यावेळी वगरवाडी शिवारात बसच्या पाठीमागील भागातून अचानक धूर निघत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे चालकाने तातडीने बस थांबवून भाविकांना खाली उतरविले. यावेळी परिसरातील नागरीक त्यांच्या मदतीसाठी धावले. त्यांनी वाहनातील सर्व प्रवाशांना

### ४० प्रवासी थोडक्यात बचावले

खाली उतरविले व काही साहित्यही बाहेर काढले.

बघता - बघता आगीने रौद्ररुप धारण केले. या घटनेची माहिती मिळताच औंढा पोलिस ठाण्याचे निरीक्षक जी. एस. राहिरे, उपनिरीक्षक शेख खुद्दूस, बंडू काळे, नगरसेवक राम मुळे, किरण घोंगडे, शेख अन्वर पठाण, आसेफ कुरेशी, शेख सोहेल यांच्यासह परिसरातील नागरिकांनी मिळेल त्या साहित्याने पाणी ओतून बसची आग विझवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर नगर पंचायतीचे अग्नीशमनदल घटनास्थळी दाखल झाले. आग विझविण्याचे काम सुरु अद्याप सुरू आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी तातडीने तहसीलदार डॉ. हरीष गाडे, नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव यांना घटनास्थळी रवाना केली आहे. महसूल प्रशासनाने या भाविकांच्या भोजन व निवासाची मदत करण्याचे काम सुरु केले आहे.

सदर खाजगी बस कोल्हापूर जिल्ह्यातील असल्याचे सुत्रांनी सांगितले. कर्नाटक येथून रविवारी ता. ६ दुपारी भाविक निघाले होते. त्यानंतर आज हा प्रकार घडला आहे. बसमधील वायरींगमुळे आग लागली असावी अशी शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.



# पाण्याचा अतिवापर करणाऱ्यांवर गुन्हे दाखल होणार

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ७ :

ज्या ग्राहकांकडे पाणी पुरवठ्याच्या देयकांची मोठी थकबाकी आहे अशा ग्राहकांची नळ जोडणी कापा. अनधिकृत नळ कनेक्शन घेणारे व पिण्याच्या पाण्याचा अतिवापर करणाऱ्यांच्या विरोधात एफआयआर दाखल करा. त्यांची नावे फलकांवर प्रसिद्ध करा. वर्तमानपत्रात द्या. तरच सर्वसामान्य लोकांना न्याय मिळेल, असे आदेश आमदार रवी राणा यांनी सोमवारी दिले.



## आमदार रवी राणा यांचे आदेश

अप्पर वर्धा धरणात पुरेसा पाणी साठा आहे. उद्योग, शेतीसाठी आरक्षण असलेल्या पाण्याचा वापरही कमी आहे. तरीही पाणी टंचाई कशी? हे या पुढे चालणार नाही, असे खडेबोल त्यांनी सुनावले. आमदार रवी राणा यांच्या यांच्या अध्यक्षतेखाली पाणीटंचाई आढावा बैठक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालटेकडी येथील कार्यालयात पार पडली. या बैठकीला प्रभारी मुख्य अभियंता संतोष गव्हाणकर, अधीक्षक अभियंता संतोष गव्हाणकर, कार्यकारी अभियंता विवेक सोळंके, उपकार्यकारी अभियंता संजय लेवरकर, एकशे पाच गावे पाणीपुरवठा योजना उपकार्यकारी अभियंता विजय लोखंडे, शाखा अभियंता मोरेश्वर आजणे आदी उपस्थित होते. आमदार रवी राणा यांनी या बैठकीमध्ये उपस्थित असलेल्या सर्व शहरी आणि ग्रामीण लोकांच्या समस्या ऐकून घेतल्या. ज्या ठिकाणी पाणी पोहोचत नाही, त्यांच्या संदर्भात नियोजन करून वेळापत्रक तयार करावे, अशी सूचना केली. बेलपुरा, फॉरेस्ट कॉलनी, राहुल कॉलनी, यशोदा नगर, नवाथे, जेवड नगर, मोती नगर, चैतन्य कॉलनी परिसर, बडनेरा नवी वस्ती व जुनी वस्ती इत्यादी ठिकाणच्या तक्रारी वाढतच गेल्या. नागरिकांच्या भावना संतप्त झाल्यामुळे संबंधित भागाचे शाखा अभियंता मोरेश्वर आजने यांना आमदार रवी राणा यांनी बैठकीतून बाहेर जाण्यास सांगितले. ही सर्व कामे मंजूर करून पूर्ण करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली. या पुढे सुधारणा करा. बैठकीमधून हाकलण्याची वेळ येऊ देऊ नका. आम्ही १ हजार कोटी रुपये खर्चाची योजना राज्य सरकार, केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून मंजूर करून आणतो. तुम्ही अधिकारी मात्र नियोजन करत नाही.

ज्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून, आमदार म्हणून आम्हाला नागरिक जबाबदार ठरवतात. हे या पुढे चालणार नाही, अशा शब्दात आमदार रवी राणा यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अधिकाऱ्यांनी नियोजन न केल्याने मुबलक पाणी असूनही पाणीटंचाई असल्याबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला.

# विजेच्या झटक्याने तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, रत्नागिरी, दि. ७ :

झाडाचे आंबे काढताना लोखंडी आकड्याचा स्पर्श हायव्होल्टेज तारेला झाल्यामुळे एका तरुणाचा कोळसा झाल्याची हृदयद्रावक घटना रत्नागिरी जिल्ह्यात घडली आहे. या घटनेमुळे हापूस आंब्यांसाठी प्रसिद्ध असणाऱ्या रत्नागिरी जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, राजू इलम असे मृत तरुणाचे नाव आहे. हा तरुण पुण्याच्या खेड तालुक्यातील होता. शनिवारी सकाळी तो शहरानजीकच्या चंपक मैदानातील आंब्याच्या बागेत लोखंडी आकड्याने आंबे काढण्याचे काम करत होता. या झाडाजवळून उच्चदाबाची विज वाहिनी जात होती. या वाहिनीला राजूच्या हातातील लोखंडी आकड्याचा स्पर्श झाला. त्याचा त्याला जोरात धक्का बसला. तो झाडावरून खाली पडताच तिथे असणाऱ्या इतर लोकांनी त्याला तत्काळ रुग्णालयात दाखल केले. पण त्याला मृत घोषीत केले.












# कृषीमंत्री माणिकराव कोकाटेच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी शिवसेना रस्त्यावर

■ महासागर प्रतिनिधी,
चंद्रपूर, दि. ७ :

कर्जमाफीची रक्कम शेतकरी लग्नसमारंभावर उधळतात, अशा राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या या विधानानंतर विरोधात जिल्हा शिवसेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने जिल्हाधिकारी कार्यालय समोर आंदोलन करण्यात आले. मंत्री कोकाटे यांच्या विधाना विरोधात कोकाटे यांनी शेतकऱ्यांची जाहीर माफी मागावी आणि राज्य सरकारने त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी करत निषेध व्यक्त केला आहे.




शिवसेना जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हे याच्या नेतृत्वात निषेध आंदोलन करण्यात आले. बळीराजा हा जगाचा पोशिंदा आहे, पण त्याचा अपमान करण्याची एकही संधी भाजप युती सरकार सोडत नाही. राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंना सत्तेचा एवढा माज चढला आहे, की ते सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करत आहेत.

अश्या मुजोर मंत्री कोकाटे यांच्यासारखी माणसे अशी विधाने करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत आहेत.

मुख्यमंत्र्यांनी अशा मंत्र्यांचा राजीनामा घेऊन त्यांना कार्यमुक्त केले पाहिजे, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हे उपजिल्हाप्रमुख सिक्की यादव, शालिक फाले, विधानसभा प्रमुख प्रमोद पाटील, तालुका प्रमुख आशिष कावटवार ,महिला जिल्हाप्रमुख कल्पना घोरघाटे, तालुका प्रमुख विकास वीरूटकर,बल्लारपूर तालुका प्रमुख प्रकाश पाठक, माजी तालुका प्रमुख संतोष नरूले, युसूफ, महिला शहर प्रमुख ज्योती गहलोट , मनस्वी गिऱ्हे, उपशहर प्रमुख प्रमोद कोलारकर, लोकेश कोटरंगे, युवासेना चिटणीस सुमीत अग्रवाल, युवासेना शहर प्रमुख वैभव काळे,वासिम खान भाई,गणेश ठाकूर, समीर कुरेशी, राहुल भोयर, बाळू भगत, हंसू खरोले, प्रशांत गडाला, प्रशांत मांडरे, सोनु लिहीकर,शारुखह शेख, चेतन,जय हिकरे, साजिद शेख, केतन बेले, मयंक, तुषार, दीपांशु ,मंथन, मुकेश, इत्यादी शिवसैनिक, महिला आघाडी, युवासैनिक उपस्थित होते.

# कौटुंबिक वादातून पत्नी आणि सासूला जिवंत जाळण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. ७ :

नाशिकमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पतीने पत्नीसह सासूला जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला आहे, सिन्नर तालुक्यातील सोनारी गावात हा प्रकार घडला आहे. कौटुंबिक वादातून पतीने हे पाऊल उचलल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, स्नेहल शिंदे (१९ वर्षे) आणि अनिता शिंदे या दोघी मायलेकी घरामध्ये झोपल्या असताना त्याठिकाणी स्नेहलचा नवरा आला आणि त्याने दोघींना जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. यामध्ये जाळण्याचा प्रयत्न करणारा पती केदार हंडोरेही या आगीत जखमी झाला आहे.

केदार हंडोरे यांचा सोनारी गावातील स्नेहल शिंदे हिच्यासोबत काही दिवसांपूर्वी विवाह झाला. स्नेहल आपल्या आईसोबत नाशिकच्या सिन्नर तालुक्यातील सोनारी गावमध्ये राहते. काल मध्यरात्री केदारने घरात घुसून ज्वलनशील पदार्थ फेकला. यामध्ये घराला आग लागली. या आगीत बायको स्नेहल शिंदे ही ५० टक्के तर सासू अनिता शिंदे या ६५ टक्के भाजल्या गेल्या. पत्नी आणि सासूला जाळण्याचा प्रयत्नांत केदार हंडोरे ७० टक्के भाजला गेला आहे, त्यांच्यावर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. केदार हंडोरेने असं कृत्य का केलं यामागचे कारण अद्याप समोर आले नाही.

दरम्यान राज्यात गुन्हेगारीच्या घटनामध्ये वाढ होताना दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वीच नाशिकच्या आंबेडकरवाडी येथे दोन सख्ख्या भावांची निर्घृण हत्या करण्यात आली आहे.रंगपंचमीच्या रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने वार करत दोघा भावांचा सार्वजनिक शौचालयासमोर निर्घृण खून केला.


